७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. १८ मे २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# अत्याधुनिक कर्करोग केंद्राचे लोकार्पण

## सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारलेले कर्करोग रुग्णालय आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे (दै. संध्या)**

पुणे महानगरपालिकेच्या जागेवर सामाजिक बांधिलकी जपत उभारण्यात आलेले अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय हे आरोग्य क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पाऊल असून सार्वजनिक - खाजगी भागीदारीतून निर्माण झालेले हे केंद्र आरोग्य क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

पुणे महानगरपालिका आणि आपुलकी हेल्थकेअर यांच्या संयुक्त उपक्रमातून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कर्करोग केंद्राच्या लोकार्पण प्रसंगी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर, आमदार राहुल कुल, उपमहापौर परशुराम वाडेकर, महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कर्करोगाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढत आहे. वेळेत निदान आणि उपचार मिळाल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. मात्र उपचारात विलंब झाल्यास रुग्णांना दीर्घकाळ उपचार घ्यावे लागतात आणि त्यासाठी मोठा आर्थिक खर्चही करावा लागतो. हीच बाब लक्षात घेत सर्वसामान्य नागरिकांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने विविध आरोग्य योजनांमध्ये कर्करोग उपचारांचा समावेश केला आहे.



महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर 'कर्करोग ग्रीड' तयार करण्यात येत असून या माध्यमातून राज्यातील रुग्णांना अधिक सक्षम आणि सुलभ उपचार सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. राज्यभरातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी आणि समन्वयित करण्यासाठी हे ग्रीड महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. पुणे महानगरपालिका आणि आपुलकी फाउंडेशनच्या माध्यमातून सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून उभारण्यात आलेल्या या उपक्रमाचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी कौतुक केले.

कार्यक्रमास महानगपालिकेचे पदाधिकारी, आपुलकी फाउंडेशनचे पदाधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

तत्पूर्वी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी रुग्णालयाची पाहणी करून विविध उपचार विभाग, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे तसेच रुग्णांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधांची माहिती जाणून घेतली.

# राष्ट्रवादीच्या झिशान सिद्दीकींची आमदारकी धोक्यात?

**मुंबई (दै. संध्या)**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ने नुकतेच झिशान सिद्दीकी यांना विधान परिषदेवर पाठवले. मात्र, त्यांच्या उमेदवारीच्या एबी फॉर्मवर सुनील तटकरे यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणून केलेल्या स्वाक्षरीवरून आता नवा वाद निर्माण झाला आहे. तटकरे सध्या पक्षाचे अधिकृत प्रदेशाध्यक्ष आहेत की नाही, याबाबतच संभ्रम असल्याने झिशान सिद्दीकी यांच्या आमदारकीवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घडामोडीमुळे राष्ट्रवादीच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे.राष्ट्रवादीने नुकतेच झिशान सिद्दीकी यांना विधान परिषदेवर पाठवले होते. पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या प्रदिर्घ चर्चेनंतर झिशान सिद्दीकी यांना संधी देण्याचा निर्णय झाला होता. त्यानंतर सुनील तटकरे यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांच्या एबी फॉर्मवर स्वाक्षरी केली होती. पण राष्ट्रवादीने पक्षाध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या सहीने निवडणूक आयोगाला पाठवलेल्या



एका पत्रात सुनील तटकरे यांचा प्रदेशाध्यक्ष म्हणून उल्लेख नाही. त्यामुळे तटकरेंची स्वाक्षरी झिशान सिद्दीकींसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सुनेत्रा पवार यांच्या स्वाक्षरीच्या 29 एप्रिलच्या सदर पत्रात पक्षाकडून करण्यात येत असलेला हा पत्रव्यवहार अंतिम समजण्यात यावा असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे 30 एप्रिल रोजी झिशान सिद्दीकी यांनी विधान परिषदेच्या आपल्या उमेदवारी अर्जात एक एबी फॉर्म जोडला. त्यावर प्रदेशाध्यक्ष म्हणून सुनील तटकरे यांची स्वाक्षरी आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




# कल्याण रेल्वे स्टेशनवर अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**मुंबई (दै. संध्या)**

अहिल्यानगरहून खोपोली येथे आपल्या मामाच्या घरी जाणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर एका नराधमाने कल्याण रेल्वे स्थानकावर अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली आहे. नसरापूर अत्याचार प्रकरणामुळे अवघ्या महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असताना ही घटना घडली आहे हे विशेष.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, पीडित मुलगी अहिल्यानगर येथून खोपोली येथे आपल्या मामाच्या गावी जात होती. ती कल्याण रेल्वे स्थानकात लोकल ट्रेनची वाट पाहत उभी होती. त्यावेळी आरोपी सौरभ सोनावणे याने तिच्या हातातील मोबाईल हिसकावून घेतला. मुलीने त्याच्याकडे आपला मोबाईल परत मागितला असता त्याने 'मोबाईल हवा असेल तर माझ्यासोबत पोलिस स्टेशनमध्ये चल' असे सांगितले. त्यानंतर आरोपी मुलीला घेऊन कल्याण रेल्वे यार्डात गेला. तिथे त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यावेळी पीडितेने स्वतःची कशीबशी सुटका करून घेऊन रेल्वे पोलिस ठाणे गाठले. त्यानंतर पोलिसांना आपल्यावर आलेला प्रसंग सांगितला.




■ पीडिता मुलगी मामाच्या घरी जात होती; लोकलची वाट पाहताना आरोपीने हेरले

तिची आपबीती ऐकताच पोलिसांनी प्रकरणाचे गांभिर्य ओळखत तातडीने तपासाला सुरूवात केली. त्यांनी कल्याण रेल्वे स्थानकातील सीसीटीव्ही फुटेज खंगाळून आरोपी सौरभ सोनावणे याच्या मुसक्या आवळल्या. सध्या आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. पोलिसांच्या मते, पीडित मुलीला कल्याणहून खोपोली येथे आपल्या मामाच्या घरी जायचे होते. त्यासाठी ती कल्याण रेल्वे स्थानकात लोकल ट्रेनची वाट पाहत होती. त्यावेळी आरोपीने तिचा मोबाईल हिसकावून घेत तिला आपल्यासोबत येण्यास भाग पाडले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केला.

# संत रविदासांच्या विचारांचा प्रसार होणे आवश्यक : मंत्री ॲड. आशिष शेलार

'स्कूल ऑफ ह्युमॅनिटीज ॲण्ड सोशल सायन्सेस'ने तयार केलेल्या संशोधन प्रकल्पाची केंद्र सरकारकडे तातडीने शिफारस करण्याचे निर्देश

**मुंबई (दै. संध्या)**

भारतीय आध्यात्मिक परंपरेतील महान संत रविदास यांचे विचार, तत्त्वज्ञान आणि कार्य अत्यंत प्रेरणादायी व समाजप्रबोधनात्मक असून, त्यांचा व्यापक अभ्यास आणि प्रसार होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या विद्यापीठातील 'स्कूल ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेस' विभागाने तयार केलेल्या संशोधन प्रकल्पाची केंद्र सरकारकडे तातडीने शिफारस करण्यात यावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांस्कृतिक कार्य विभागास दिले.

संत रविदास यांचे भारतीय तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि भक्ती परंपरेतील योगदान महत्त्वपूर्ण असूनही त्यांच्या कार्याचे अपेक्षित प्रमाणात संशोधन झालेले नाही. आजच्या तरुण पिढीसमोर त्यांचे विचार प्रभावीपणे मांडण्याची आवश्यकता असून ते समाजासाठी प्रेरणादायी ठरू शकतात, असे मत मंत्री ॲड. शेलार यांनी व्यक्त केले.



भक्ती परंपरेतील संत रविदास यांचे सातत्यपूर्ण अस्तित्व तसेच गुरु ग्रंथ साहिब यांसारख्या प्रमाणग्रंथांमध्ये त्यांच्या रचनांचा समावेश असूनही त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास अपेक्षित प्रमाणात झालेला नाही. या पार्श्वभूमीवर डेक्कन एज्युकेशन सोसायटी विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेस' विभागाने संत रविदास यांच्या तत्त्वज्ञान, सामाजिक विचार आणि सांस्कृतिक वारशाचा अभ्यास करून एक संशोधन प्रकल्प तयार केला आहे.

या संदर्भात मंत्री ॲड. शेलार यांनी ऑनलाईन बैठकीत संबंधित प्रकल्पाचे सादरीकरण पाहून सविस्तर माहिती घेतली. संत रविदास यांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी हा प्रकल्प केंद्र सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या 'माननीय व्यक्तींच्या जन्मशताब्दी योजना' अंतर्गत सादर करता येऊ शकतो, असे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. त्यानुसार या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करून केंद्र सरकारकडे शिफारस सादर करण्यात यावी, अशा सूचना मंत्री ॲड.शेलार यांनी दिल्या.

या प्रकल्पामध्ये संत रविदास यांच्या तत्त्वज्ञानाचे अभ्यासपूर्ण पुनर्मूल्यांकन, त्यांच्या सांस्कृतिक वारशाचे पुनरुज्जीवन तसेच समकालीन शैक्षणिक, सामाजिक आणि धोरणात्मक संदर्भांमध्ये त्यांच्या विचारांच्या प्रसारासाठी शाश्वत चौकट विकसित करण्याचा समावेश आहे.

या बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक श्रीराम पांडे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## ब्रेकिंग न्यूज

### मित्र-मैत्रिणीची भोंदू बाबाकडून हत्या

धुळे/निजामपूर (दै. संध्या) : नाशिकचा बोगस 'डॉक्टर खरात' आणि सोलापूरचा 'मनोहर मामा' यांच्या भोंदुगिरीच्या घटना ताज्या असतानाच, आता धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातही अंधश्रद्धेची रक्तरंजित घटना समोर आली आहे. तेथे एका कथित भोंदूबाबाच्या आश्रमात शनी अमावस्येच्या रात्री पूजाविधीसाठी गेलेल्या मित्र-मैत्रिणीची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. भोंदूबाबाच्या सापडलेल्या रुमालावरून या घटनेचे बिंग फुटले आणि काही तासांतच पोलिसांनी बेड्या ठोकल्या. दरम्यान, पूजाविधीनंतर झालेल्या वादातून हा खून झाल्याची प्राथमिक माहिती मृत तरुणीच्या काकांनी केलेल्या तक्रारीवरून पुढे आली आहे. योगेश ऊर्फ भैय्या बापू खैरनार (रा. जैताणे, ता. साक्री) असे भोंदूबाबाचे नाव आहे. तर जयश्री रजनीकांत काकुस्ते (वय 25) आणि अक्षय गंगाधर सोनवणे दोघा मृतांची नावे आहेत. हे दोघे मित्र असून जयश्री एका फायनान्स कंपनीत एकत्र काम करत होती. तर अक्षय हा ग्रा.पं.त शिपाई असून वडिलोपार्जित केबलचा व्यवसाय करत होता. साक्री तालुक्यातील निजामपूर परिसरातील रायपूर-भडगाव रस्त्यावर शनिवारी सकाळी एका महिलेचा मृतदेह आढळून आला. या महिलेचे तोंड रूमालाने बांधले होते.

## छत्रपती संभाजी महाराज उद्यानात बसविले शिल्प

# छ. संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाचे अनावरण

**पुणे (दै. संध्या)**

पुणे महानगरपालिकेच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे उभारण्यात आलेल्या बुधभूषण ग्रंथ रचनाकार छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, आमदार डॉ. नीलम गोऱ्हे सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, महापौर मंजुषा नागपुरे, उप महापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेता गणेश बिडकर, स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, महानगर पालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




**बुधभूषण ग्रंथ रचनाकार छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाविषयी**

- छत्रपती संभाजी महाराज यांचे 'बुधभूषण' ग्रंथ रचतानाचे विश्वातील पहिले १० फुट उंचीचे पूर्णाकृती कांस्य शिल्प महाराष्ट्रात प्रथमच पुणे महानगरपालिकेच्यावतीने शिवाजीनगर येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे उभारण्यात आले आहे. या प्रकल्पास एकूण ५ कोटी इतका खर्च झालेला आहे.
- छत्रपती संभाजी महाराज यांचे 'बुधभूषण' ग्रंथातील श्लोक निवडण्याकरिता इतिहास तज्ज्ञ, संस्कृत-मराठी भाषातज्ज्ञ, अभ्यासक यांची इतिहास तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आलेली होती. या समितीमार्फत छत्रपती संभाजी महाराज यांनी लिहिलेल्या संस्कृत 'बुधभूषण' ग्रंथामधून आवश्यक श्लोक निवडण्यात आलेले आहेत.
- 'बुधभूषण' संस्कृत ग्रंथ रचनाकार छत्रपती संभाजी महाराज पूर्णाकृती पुतळा व महाराजांनी रचलेल्या ९ निवडक श्लोक मराठी व इंग्रजी अर्थासह तसेच बुधभूषण ग्रंथाची संक्षिप्त माहिती देणाऱ्या प्रस्तावनेसह कोरण्यात आलेले आहेत. याकरिता भव्य १० दगडी भिंती उभारण्यात आलेल्या आहेत. शिल्पाच्या भोवती रंगीत कारंजे, तसेच संपूर्ण परिसरात विविध शोभीवंत फुलझाडे लावण्यासह विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे.
- अतिशय कठीण कालखंडामध्ये हिंदवी स्वराज्याची धुरा यशस्वीपणे सांभाळणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व जगासमोर आणण्यासाठी महानगर पालिकेच्यावतीने देदीप्यमान शिल्प उभारण्यात आले आहे. यामुळे पुण्याच्या सांस्कृतिक वैभवात भर पडणार असून या ठिकाणी भेट देणाऱ्या प्रत्येक नागरिकाला महाराजांच्या गौरवशाली इतिहासापासूनची प्रेरणा मिळणार आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घडामोडी वाढल्या

*पार्थ पवारांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट; परांजपे पवारांच्या भेटीसाठी सिल्व्हर ओकवर*

**मुंबई (दै. संध्या)**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे सुपुत्र खासदार पार्थ पवार यांनी शनिवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत उभयंत्यांत कोणती चर्चा झाली हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण त्यांच्यात राष्ट्रवादी काँग्रेसमधील बड्या नेत्यांची कथित नाराजी व पक्षाशी संबंधित इतर काही मुद्यांवर चर्चा झाल्याची माहिती आहे. त्यातच सत्ताधारी शिवसेनेचे नेते आनंद परांजपे यांनी सिल्व्हर ओकवर जाऊन शरद पवारांची भेट घेतली आहे. त्यामुळे या घडामोडींकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, खासदार पार्थ पवार यांनी शनिवारी रात्री 10 वा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या वर्षा निवासस्थानी भेट घेतली. ते यावेळी एकटेच होते. त्यांच्यासोबत राष्ट्रवादीचा कोणताही बडा नेता किंवा कोणताही सहकारी उपस्थित नव्हता. या दोन्ही नेत्यांत जवळपास 45 मिनिटे चर्चा झाली. पण त्या चर्चेचा तपशील अद्याप समोर आला नाही. त्यामुळे या दोन्ही नेत्यांनी नेमका कोणत्या मुद्यांवर संवाद साधला हे कळू शकले नाही. पण सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत



वादाच्या पार्श्वभूमीवर या भेटीला मोठे महत्त्व आले आहे.विशेष म्हणजे गत काही दिवसांपासून सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल यांची राष्ट्रवादीच्या कार्यकारिणीतून हकालपट्टी करण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे. यामुळे हे दोन्ही बडे नेते नाराज झाल्याची माहिती आहे. या घडामोडींवर स्थिती स्पष्ट करण्यासाठी राष्ट्रवादीने शनिवारी एक पत्रकार परिषद घेतली. त्यात प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे हे त्यांच्या अनुक्रमे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष या पदांवर पूर्ण अधिकारांसह कायम असल्याचे स्पष्ट करण्यात आले. केंद्रीय निवडणूक आयोगाने पाठवलेल्या पत्रात या दोन्ही नेत्यांच्या मुख्य पदांचा उल्लेख नव्हता. ती केवळ एक कारकुनी चूक होती. यासंदर्भात आयोगाला लवकरच एक नवे पत्र पाठवून पटेल व तटकरे यांच्यासह पक्षातील इतर सर्व जबाबदाऱ्यांची स्पष्ट माहिती दिली जाईल, असे पक्षाने या प्रकरणी स्पष्ट केले.

# संपादकीय

## ‘थलपती’ विजय बनला लेटेस्ट ‘राजकीय युनिकॉर्न’

उद्योगविश्वातील सर्वात झळाळता शब्द आहे ‘युनिकॉर्न’! एखाद्या ‘स्टार्टअप’ने एक अब्ज डॉलरचे मूल्यमापन गाठले, की त्या नवउद्योगाला ‘युनिकॉर्न’ म्हटले जाते. एखादा ‘स्टार्टअप’ जसा बाजारपेठेतील एखादी समस्या ओळखून जन्म घेतो, तसाच राजकीय ‘स्टार्टअप’ही व्यवस्थेतील पोकळीतून उगवतो. राजकीय ‘स्टार्टअप’च्या बाबतीत ‘फंडिंग’ म्हणजे जनसमर्थन, ‘प्रॉडक्ट-मार्केट फिट’ म्हणजे मतदाराशी जुळणारी भूमिका आणि ‘आयपीओ’ म्हणजे पहिली निवडणूक! तामिळ सुपरस्टार विजय जोसेफ यांच्या तमिळग वेट्री कळगम (टीव्हीके) पक्षाने, स्थापनेनंतर अवघ्या दोनच वर्षांत, तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत १०८ जागा जिंकून, द्रविड मुन्नेत्र कळगम आणि अण्णा द्रविड मुन्नेत्र कळगमसारख्या प्रस्थापित पक्षांचे तब्बल ५९ वर्षांपासूनचे वर्चस्व मोडून काढले! हे राजकीय ‘युनिकॉर्न’ होणे नव्हे तर दुसरे काय? बोफोर्स घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर राजीव गांधी सरकारमधून बाहेर पडलेल्या व्ही. पी. सिंग यांनी १९८८ मध्ये जनता दलाची स्थापना करत तेलुगू देसम, द्रमुक, आसाम गण परिषदेला एकत्र आणून राष्ट्रीय आघाडी केली. पुढील लोकसभा निवडणुकीत त्या आघाडीने काँग्रेसला सत्तेतून खाली खेचले. सिंग यांची स्वच्छ प्रतिमा ही त्या ‘स्टार्टअप’ची ‘ब्रँड व्हॅल्यू’; पण मंडल आयोग, बाबरी वादांमुळे हे ‘युनिकॉर्न’ ११ महिन्यांतच कोसळले! जून १९९९ मध्ये सोनिया गांधींना विरोध केल्याने शरद पवार, पी. ए. संगमा व तारिक अन्वर यांना काँग्रेसमधून निष्कासित करण्यात आले. त्यातूनच राष्ट्रवादी काँग्रेस हे राजकीय ‘स्टार्टअप’ जन्माला आले. त्याच वर्षी झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत या पक्षाने ५८ जागा जिंकून काँग्रेससोबतच आघाडी सरकार स्थापन केले! ‘स्टार्टअप’च्या भाषेत ‘पिव्होट’ म्हणजे दिशा बदल केला, पण ‘मार्केट शेअर’ टिकवला! अजित पवारांच्या २०२३ मधील बंडामुळे हे ‘स्टार्टअप’ दुभंगले! तेलंगणा राज्याच्या मागणीसाठी तेलुगु देसम पक्षातून बाहेर पडत, के. चंद्रशेखर राव यांनी २००१ मध्ये तेलंगणा राष्ट्र समिती (टीआरएस) हा राजकीय ‘स्टार्टअप’ उभा केला; पण त्याला ‘युनिकॉर्न’चा दर्जा मिळण्यासाठी एक तपाहून अधिक काळ वाट बघावी लागली. दरम्यानच्या काळात त्याचे भारत राष्ट्र समिती (बीआरएस) म्हणून ‘री-ब्रँडिंग’ही करण्यात आले. पहिले राजकीय ‘युनिकॉर्न’ म्हणजे तेलुगु सुपरस्टार एन. टी. रामाराव यांचा तेलुगू देसम पक्ष! पक्षाची स्थापना १९८२ मध्ये झाली आणि एनटीआरच्या अफाट लोकप्रियतेवर स्वार होत, पक्षाने १९८३ मधील आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीत जबरदस्त विजय मिळवला. उद्योगविश्वाच्या भाषेत, पहिल्याच ‘लॉन्च’मध्ये बाजारपेठेचा सत्तर टक्के हिस्सा काबीज केला! त्यासाठी एनटीआर यांनी ‘चैतन्य रथम’मधून संपूर्ण आंध्र पिंजून काढला होता. उद्योगविश्वाच्या भाषेत ती थेट ग्राहकाशी जोडणारी ‘स्ट्रॅटेजी’ होती! तेलुगू देसमपेक्षाही अधिक नाट्यमय आहे आसाम गण परिषदेचा उदय! विद्यार्थी नेता प्रफुल्लकुमार महंत यांनी १९७९ मध्ये बांगलादेशी घुसखोरांच्या विरोधात आंदोलन छेडले. त्याचा शेवट १९८५ मध्ये आसाम कराराने झाला आणि आसाम गण परिषद पक्षाची स्थापना झाली. त्याच वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळवत, अवघ्या ३३ वर्षांचे महंत मुख्यमंत्री बनले. ते आणि त्यांचे बहुतांश मंत्री हॉस्टेलमधूनच शपथविधीसाठी गेले होते! अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून २०१२ मध्ये जन्मलेल्या आम आदमी पक्षाने, डिसेंबर २०१३ मध्ये दिल्ली विधानसभेत २८ जागा जिंकताना, मुख्यमंत्री शीला दीक्षितांनाही पराभूत केले! त्यानंतर २०१५ मध्ये ७० पैकी ६७ जागा जिंकल्या. पंजाबमध्येही सत्ता मिळवत, ‘आप’ सर्वात वेगाने वाढलेले राजकीय ‘स्टार्टअप' ठरला; पण ‘इमानदार' ही प्रतिमा शीशमहल प्रकरणात गंजली आणि २०२५ मध्ये ‘व्हॅल्युएशन क्रॅश’ होताना, दिल्लीत २२ जागांपर्यंत घसरण झाली.

## संस्कृत सुभाषित

अरसिकेषु कवित्व निवेदनम, शिरसि लिख
मा, लिख मा, लिख मा।।

अर्थ – काव्यास्वाद घेण्यासाठी रसिकही तसेच जाणते असावे लगतात. ज्यांना त्या विषयातले काही कळत नाही, गोडी नाही, अशा ढम्म अरसिकांपुढे काव्यागायंन करण्याचा प्रसंग, हे परमेश्वरा, माझ्या नशिबात लिहू नको, असे कवी म्हणतो.

## आगामी साप्ताहिकी

१८ मे २०२६ सोमवार
धनिष्ठानवक समाप्ती सकाळी ११.३२
मुस्लिम जिल्हेज मासारंभ

१९ मे २०२६ मंगळवार
विनायक चतुर्थी (अंगरक योग)


२० मे २०२६ बुधवार

२१ मे २०२६ गुरुवार
गुरुपुष्यामृतयोगी सकाळी ६.०५ पासून उ.रात्रौ २.४९ पर्यंत

२२ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
भारतीय ज्येष्ठ मासारंभ
जरधोस्तनी दिसो
शाबुओथ (ज्यू)

२३ मे २०२६ शनिवार
दुर्गाष्टमी

## उपदेशकथा



### दृढ संकल्प

कालीदास मंद बुद्धीचा काळा कुरुप व्यक्ती होता. ज्या फांदीवर बसला होता तिलाच कापत होता. जंगलात त्याला या अवस्थेत बसलेले पाहुन राजसभेतून विद्योत्तमाद्वारे अपमानित पंडितांनी त्या पंडितेस शास्त्रात हरवणे व तिच्यासोबत लग्न करण्याचा कट आखण्यासाठी कालीदासला श्रेष्ठ पात्र मानले. शास्त्रात आपल्या कुटीलताने त्यास मौन विद्वान समजून त्यांनी प्रत्येक प्रश्नाचे समाधान अशाप्रकारे केले की विद्योत्तमाने त्या महामूर्खासमोर पराभव कबुल करत त्यास आपला पती स्वीकारले. पहिल्याच दिवशी जेव्हा त्याला वास्तविकता कळाली तेव्हा तिने त्याला घरातून हाकलून लावले. हाकलताना ज्या शब्दात तिने त्याचा अपमान केला, तो त्याच्या जिव्हारी लागला. दृढ संकल्प अर्जित करत तो आपल्या ज्ञान वृद्धी लागला. अखेरीस तोच महामूर्ख आपल्या अध्ययनाने कालांतराने 'महाकवी कालीदास' रुप प्रकट झाला व आपल्या विद्वतेची साधना पुर्ण करुन विद्योत्तमासोबत त्याचे पुनर्मिलन झाले.

## पंचांग

| | |
|---|---|
| १८ मे २०२६ | करण:बालव ०७:४६:१३ |
| सोमवार | करण:कौलव १७:५३:२१ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल |
| अधिक ज्येष्ठ शके | २८:०३:४४+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मिथुन२२:०४:३४ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – १ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:द्वितीया १७:५३:२१ | धनिष्ठानवक समाप्ती |
| नक्षत्र:रोहिणी ११:३१:४० | सकाळी ११.३२ |
| योग:सुकर्मा २१:४७:२० | मुस्लिम जिल्हेज मासारंभ |

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९५२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | | 6 | | | | 4 | |
| 2 | | | 3 | | | | 7 | 1 |
| | | | 9 | 2 | | 8 | | 6 |
| 1 | 3 | | | | | 4 | | 7 |
| | 2 | 5 | | | | 1 | 6 | |
| 4 | | 7 | | | | | 2 | 3 |
| 9 | | 3 | | 6 | 4 | | | |
| 6 | 1 | | | | 2 | | | 8 |
| | 7 | | | | 8 | | 3 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९५१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 1 | 8 | 2 | 6 | 5 | 7 | 9 | 3 |
| 3 | 5 | 9 | 4 | 1 | 7 | 6 | 2 | 8 |
| 2 | 6 | 7 | 3 | 8 | 9 | 5 | 1 | 4 |
| 7 | 8 | 3 | 1 | 5 | 6 | 9 | 4 | 2 |
| 5 | 4 | 1 | 8 | 9 | 2 | 3 | 6 | 7 |
| 6 | 9 | 2 | 7 | 3 | 4 | 8 | 5 | 1 |
| 8 | 7 | 5 | 6 | 4 | 1 | 2 | 3 | 9 |
| 9 | 3 | 4 | 5 | 2 | 8 | 1 | 7 | 6 |
| 1 | 2 | 6 | 9 | 7 | 3 | 4 | 8 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२६८ – मामलुक सुलतान बैबर्सने सिरियातील अँटिओक शहर लुटले.
- १६५२ – अमेरिकेच्या ऱ्होड आयलंड राज्याने गुलामगिरी बेकायदेशीर ठरवली.
- १७६५ – कॅनडातील मॉन्ट्रिआल शहरात भीषण आग.
- १८०३ – युनायटेड किंग्डमने एमियेन्सचा तह झिडकारला व फ्रांसविरुद्ध युद्ध पुकारले.
- १८०४ – नेपोलियन बोनापार्ट फ्रांसच्या स्म्राटपदी.
- १८६९ – जपानचे एझो प्रजासत्ताक बरखास्त.
- १८७६ – कॅन्ससच्या डॉज सिटी शहरात वायेट अर्प पोलिसकामात रुजू झाला.

### राष्ट्रीय

- १९१२– रामचंद्र गोपाळ तथा दादासाहेब तोरणे यांनी तयार केलेला पहिला भारतीय मूकपट भक्त पुंडलिक मुंबई येथे गिरगावमधील कॉरोनेशन सिनेमॅटोग्राफिक थिएटरमध्ये प्रदर्शित झाला.
- १९७२ – कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना.
- १९७४ – भारताने पोखरण १ परमाणू परीक्षण केले. परमाणू ताकद असणारा सहावा देश झाला.
- २००७ – हैद्राबादच्या मक्का मशिदीजवळील झालेल्या स्फोटात ९ जण ठार झाले आणि ३५ जण जखमी झाले.

### जन्म

- १०४८ – उमर खय्याम, पर्शियन कवीचा जन्म.
- १७९७ – फ्रेडेरिक ऑगस्टस दुसरा, सॅक्सनीचा राजा याचा जन्म.

### निधन

- १४५० – सेजाँग, कोरियाचा स्म्राटचा निधन.
- १५८४ – इकेदा मोटोसुके, जपानी सामुराईचा निधन.
- १६७५ – जॉक मार्केट, फ्रेंच जेसुइट धर्मप्रचारक व शोधकाचे निधन.

## : SMS :

Today Is
Thappar Day.
Jo B Is Time Ap K
Sath Betha Hua
Hai Usey Rakh K
Thappar Marein.

And Plz Forward
Dis Msg As Much
As U Can.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.८ | २७.१ |
| अहमदनगर | ३९.३ | २५.४ |
| अकोला | ४३.६ | ३०.३ |
| अमरावती | ४२.२ | २८.७ |
| बीड | ४६.३ | ३२.४ |
| भंडारा | ४६.९ | ३३.९ |
| बुलढाणा | ३८.९ | २३.५ |
| चंद्रपूर | ४६.७ | ३४.६ |
| चेन्नई | ४०.८ | ३३.७ |
| नवी दिल्ली | ३९.४ | २६.६ |
| धुळे | ४२.२ | २६.६ |
| गोंदिया | ४६ | ३२.३ |
| जळगाव | ४३.७ | २९.१ |
| कोल्हापूर | ३९.१ | २४.२ |
| लातूर | ३९.८ | २६.६ |
| मुंबई | ३९.४ | ३४.९ |
| नागपूर | ४५.४ | ३४.२ |
| नांदेड | ४३.३ | २८.६ |
| नंदूरबार | ३९.७ | २६ |
| नाशिक | ४०.७ | २३.७ |
| पुणे | ३७.८ | २२.३ |
| पंढरपूर | ४०.२ | २६.१ |
| सातारा | ३९.५ | २३ |
| सांगली | ३९.२ | २४.९ |
| सोलापूर | ४१ | २६.८ |
| वर्धा | ४४.७ | ३०.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम
गती मध्यम राहील. अडचणींचा सामना करावा लागेल.

**तूळ :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व
विचार करुन कामे केल्यास परिस्थिती सुदृढ बनवू शकेल.

**वृषभ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
कौटूंबिक सुख आणि आर्थिक अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहिल. उद्योगधंदा चांगला चालेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम
सहकार्याने दिवस उत्साहपूर्ण जाईल. थकित पैसे मिळवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**मिथून :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम
सामाजिक कार्यांमुळे सुयश आणि सन्मान मिळू शकेल. कामे पूर्ण होतील.

**धनू :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण
योजनेनुसार कामे केल्यास फायदा होईल. कौटूंबिक जबाबदाऱ्या पार पाडू शकाल.

**कर्क :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
बुद्धि आणि मनोबलाने सुख–संपन्नतेची परिस्थिती बनेल.आळस सोडून द्या.

**मकर :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
दूरदर्शिपणाने आणि बुद्धिचातूर्याने समस्या दूर होतील. आडंबरांपासून दूर रहा.


**सिंह :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व
नवीन कामकाजांचे योग प्रबळ आहेत.कौटूंबिक समस्या राहू शकतात.

**कुंभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व
वातावरण अनुकूल असूनही कामे होऊ शकणार नाही. खर्च विचार करुन करा.

**कन्या :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पूर्व
मानसिक तनावापासून सुटका मिळेल.उद्योगधंदा ठीक चालेल.

**मीन :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम
प्रयत्न सार्थक होतील. परिवर्तन किंवा नवीन संधी फायदेशीर राहतील. प्रवास कष्टदायी होऊ शकतात.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९५२



### आडवे शब्द

१. वाईट काळात माणसाची वाईट गोष्टींकडे अधिक प्रवृती होते याअर्थी वाक्प्रचार
६. सुताराचे हत्यार
१०. वेदना
११. वटवट
१२. नुसताच बडबड करणारा
१३. हिंदुस्थान
१४. योग्य, उचित
१६. कप्पा, खण
१८. 'अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओठी' -- चुका असतील केल्या, केली पण प्रीती' (अरूण दाते)
२१. प्रेम, आपुलकी
२२. मनात घुसलेला आळस
२४. आजच्या आधीचा दिवस
२५. करांगुली
२६. पर्ण
२७. बंगाल
२८. घाव, प्रहार
२९. तांदळाची एक जात
३१. तांदूळाचे पीक
३३. नोकर
३५. न थांबता, अखंडपणे
३७. कारखान्यातील मजूर
३८. पेटलेला कोळसा
३९. निखळ सौंदर्य
४०. सदोदित
४१. फक्त, केवळ
४२. घरातील भांडण
४५. तांबड्या रंगाचे औषधी लाकूड
४८. शरीर,
४९. उगाच
५१. खंदक
५३. जागा बदलणे
५६. शुभ्र पांढरे, स्वच्छ
५७. सुंदर तरुणी
५८. भीती
५९. चकाकणारे
६१. सारखा, सम
६२. नातेवाईक
६३. लाज
६४. चटकन, त्वरित
६६. मगज
६८. देशाचे नाणे
७१. मृत्यूदेवता
७२. दुर्लक्ष करणे (वाक्य प्रचार)
७४. मलईची बासुंदी
७५. शहर, गाव
७६. चांदी

### उभे शब्द

१. संकटात सापडलेल्या माणसाला छोटीशी मदतसुद्धा तारून नेते या अर्थाची म्हण
२. गडी माणसे
३. हालचालीवर ठेवलेली नजर
४. 'मधाचे बोट कुणी चाटवा' म्हणणाऱ्या लावणीतील आजार
५. पूजेचे ताट
६. दफनभूमी
७. पिरपिर करणारा
८. पोळ्यांचा वेगळा, डोशाचा वेगळा
९. हुरहूर, खंत व्यक्त करणे, १५. जेव्हा
१७. प्रख्यात
१९. बत्त्याचा साथीदार
२०. ओरिसातील पुरीचा श्रीकृष्ण
२१. पायापासून डोक्यापर्यंत
२३. उबदार पांघरुण (इंग्रजी)
२८. उत्तरधिकारी
३०. संधी
३१. हमाल
३२. मालाची कोठी, साठा
३४. हस्त
३५. अनादर, संकोच
३६. कहाणी
३८. संकट, रोग दूर करणारा
४२. सांसरिक माणूस
४३. तरंग, लाट
४४. हुबेहूब
४६. तरल, अस्थिर मन
४७. किंमत, मूल्य
५०. ब्रह्मदेवाचे जन्मस्थान
५२. नमस्कार
५४. कोल्ह्यासारखा एक प्राणी
५५. होडी
५६. शाळा, प्रशाला
५७. आईचा दादा
५९. झोंबणारे, खरमरीत
६०. पोपट
६१. मंत्रीमंडळ
६२. दूर होणे, बाजूला होणे
६५. उलटी, ओकारी
६६. घसा
६७. तांदळाच्या कण्यांची पेज
६९. मऊ
७०. वेदना, मस्तकशूळ
७३. मस्तक

### जम्बो शब्दकोडे क्र. ९५१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.देवघर ५.वखार ८.विसरभोळा १२.वनराज १३.संसद १४.मोल १५.मौत १६.बजरंग १८.समेट २०.नंद २२.येन २३.नद २४.पारख २६.दडवणे २७.सावली २८.लाडका ३०.नस ३१.जागा ३३.पारंगत ३५.मणेर ३६.समरगीत ३९.मर्द ४०.जवान ४१.वाचा ४३.काजळ ४४.कमाल ४५.साल ४६.जरतर ४८.टीकाकार ४९.किलो ५०.जड ५१. मासला ५३.पातळसर ५४.घरधनी ५६. जमालगोटा ५९.वचन ६१.वरात ६२.नकळत ६४.धमकी ६५.सारस ६६.कचराकुंडी ६८.लहरबहर ७३.पण ७४.चातक ७५.कल ७६.सुरवंट

उभे उत्तर : १.देवकीनंदन २.वन ३.घराणे ४.रज ५.वसंत ६.खास ७.रदबदली ९.सलग १०.भोळसर ११.ढाल १४.मोट १५.मौन १७.रंगीबेरंगी १९. मेखला २१.दडस २२.येणे–जाणे २३.नवरस २४.पाळत २५.बोका २९.डळमळीत ३२.गारवा ३३.पार ३४.गतकाल ३५.मनगट ३७.मजल ३८.जळजळीत ४०.जमवाजमव ४२. चाकरमानी ४५.सालोसाल ४७.रखरखीत ४८अ. काहूर ५२.लाजरा ५३.पाटा ५४.घन ५५.धडधडीत ५७.मातब्बर ५८.गोवा ६०.चणचण ६१.वकील ६२.नर ६३.कसदार ६५.सार ६६.कप ६७.कुंचा ६९.हर ७०.बक ७१.हल ७२.पोट

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वसंतदादा सेवा संस्थातर्फे राजीव गांधी स्मृती सदभावना करंडक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : वसंतदादा सेवा संस्थातर्फे "स्व.राजीव गांधी स्मृती सदभावना करंडक" भव्य क्रिकेट स्पर्धेचे पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे आयोजन करण्यात आले आहे. माजी रणजी क्रिकेट पटू रणजीत खिरीड (महाराष्ट्र क्रिकेट अपेक्स सदस्य), संजय बालगुडे (अध्यक्ष, वसंतदादा सेवा संस्था), अनिकेत तावरे (ए..टी. स्पोर्ट्स संचालक), भरत मारवाडी, सनी मारवाडी यांच्या हस्ते मैदानावर पूजन करण्यात आले. उपस्थित पाहुण्यांनी दोन्ही स्नघांची ओळख करून घेतली व सर्वांना शुभेच्छा दिल्या. लहान गटातील ८ संघांनी सहभाग घेतला आहे. पुण्यात पहिल्यांदा वयोगट ११ वर्षा खालच्या खेळाडूंची स्पर्धा खेळवली जात आहे. प्रथम क्रमांक विजयी संघला रुपय ११,०००/- रोख, दुसऱ्या क्रमांक रुपय ७,००० /- या बरोबर उत्कृष्ट खेळाडू, गोलंदाज, फलंदाजी यांना सुद्धा सन्मानित करून ट्रॉफी देण्यात येणार आहे.

### पाणी भरण्याचा वाद अन् थेट वीट डोक्यात; पाणी भरण्याच्या वादातून भावजयला मारहाण

पुणे (दैनिक संध्या) : नळाच्या पाईपने पाणी भरण्यावरून झालेल्या घरगुती वादातून दोन नणंदांनी मिळून भावजयीला बेदम मारहाण केल्याची घटना बेल्हे साकुर फाटा येथे घडली आहे. या मारहाणीत भावजयीचे डोके फुटले असून, त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. या प्रकरणी उषा सुनील गाडगे (वय ४४) यांनी आळेफाटा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून नणंद मिराबाई अरुण कणसे (रा.बोटे, ता.संगमनेर) आणि सुनंदा धनराज गायकवाड (रा.बेल्हे) यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ मे रोजी दुपारी दीडच्या सुमारास उषा गाडगे यांनी नणंदांना कपडे धुवायचे असतील, तर टाकीवर जाऊन धुवा, असे सांगितले. याचा राग आल्याने दोन्ही नणंदांनी त्यांना शिवीगाळ व दमदाटी केली. वाद वाढल्याने मिराबाई यांनी उषा यांना ढकलून खाली पाडले, तर सुनंदा यांनी हातातील वीट डोक्यात मारून गंभीर दुखापत केली. पोलिस हवालदार गोसावी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.




### डिलिव्हरी बॉय अन् कॅबचालकांना इंधन दरवाढीचा मोठा फटका

पुणे (दैनिक संध्या) : इस्रायल, अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावाचा परिणाम आता थेट सर्वसामान्य पुणेकरांच्या खिशावर होताना दिसत आहे. जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या असून, देशात शुक्रवारी (१५ मे) पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ करण्यात आली आहे. सीएनजी दोन रुपये आणि पेट्रोल तब्बल तीन रुपयांनी वाढल्याने याचा सेवा क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. शहरात दिवस-रात्र राबणारे कॅबचालक, घरपोच सेवा देणारे डिलिव्हरी बॉईज आणि टेम्पोने गल्लोगल्ली फिरून थेट सोसायट्यांपर्यंत भाजीपाला पोहोचवणारे लहान विक्रेते अडचणीत सापडले आहेत. वाहतूक खर्चात भरमसाट वाढ झाल्याने त्यांचे महिन्याचे बजेट कोलमडले असून, वाढत्या महागाईत आम्ही कुटुंबाचा गाडा हाकायचा तरी कसा?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. शहरात आजच्या घडीला साधारणपणे ३० हजार कॅब चालक रस्त्यांवर धावत आहेत. बहुतांश कॅब या सीएनजीवर चालतात. एका कॅब चालकाला व्यवसायासाठी दिवसाला सरासरी एक पूर्ण टाकी सीएनजी लागतो. त्याचा दैनिक खर्च ८०० रुपये आहे. सीएनजी महाग झाल्यामुळे रोजच्या खर्चात २० ते ३० रुपयांची थेट वाढ झाली आहे. सर्व इंधन खर्च वजा जाता आधी या चालकांचे मासिक उत्पन्न २१ ते २४ हजार रुपयांच्या घरात होते. मात्र, आता त्यात महिन्याला १,००० रुपयांची घट होत असल्याने त्यांच्यापुढे कुटुंबाचा खर्च भागवण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे.

### मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरण; दिग्विजय पाटीलविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल

पुणे (दैनिक संध्या) : मुंढवा येथील चाळीस एकर सरकारी जमिनीच्या बेकायदा विक्री प्रकरणात सहआरोपी अमेडिया कंपनीचा संचालक दिग्विजय पाटील यांच्याविरुद्ध पुणे पोलिसांनी न्यायालयात पुरवणी आरोपपत्र दाखल केले. या प्रकरणात मुख्य आरोपी शीतल किसनचंद तेजवानी विरोधात पुणे पोलिसांनी १८८६ पानांचे आरोपपत्र यापूर्वी दाखल करण्यात आले आहे. त्या वेळी सह आरोपी दिग्विजय पाटील विरोधात तपास सुरू होता. त्यानंतर आता १८० पानांचे पुरवणी आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. मुंढवा येथील ४० एकर जमीन भारतीय वनस्पती सर्वेक्षण विभागाच्या मालकीची आहे. या जमिनीच्या मूळ वतनदारांच्या वारसदारांचे कथित कुलमुखत्यार (पॉवर ऑफ अॅटर्नी) म्हणून तेजवानीने ही जमीन परस्पर अमेडिया कंपनीला बेकायदा विकली. तब्बल १८०० कोटी रुपये किमतीच्या या जमिनीचा व्यवहार ३०० कोटी रुपयांमध्ये झाला. या बेकायदा व्यवहाराची दस्तनोंदणी करताना कोट्यवधी रुपयांचे मुद्रांक शुल्क चुकवून सरकारची फसवणूक करण्यात आली, असे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाच्या तपासात मिळालेली माहिती, तसेच दस्तऐवजाची पाहणी केल्यानंतर या प्रकरणातील आरोपपत्रात पाटील यांचे नाव समाविष्ट करण्यात आले.




## वर्ल्ड हायपरटेन्शन डे निमित्त रुबी हॉल क्लिनिक तर्फे

# 'चेक टुडे फॉर अ बेटर टुमॉरो' रेड बलून मोहिमेचे आयोजन

पुणे (दै. संध्या)

जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त रुबी हॉल क्लिनिक तर्फे "चेक टुडे फॉर अ बेटर टुमॉरो" या अनोख्या जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. वाढत्या उच्च रक्तदाबाच्या समस्येबाबत जनजागृती करणे आणि नियमित रक्तदाब तपासणीचे महत्त्व अधोरेखित करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या मोहिमेअंतर्गत रुबी हॉल क्लिनिकच्या परिसरात १० फूट उंचीची "रेड बलून वॉल" उभारण्यात आले होते . यावेळी डॉ. परवेझ ग्रँट, डॉ. सायमन ग्रँट, रुबी हॉल क्लिनिकचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मुदित सक्सेना, मुख्य कामकाज अधिकारी श्री. उर्वाक्ष भोट, वैद्यकीय संचालक डॉ. विवेक लाल, न्युरो-इंटेन्सिव्ह केअर युनिटचे प्रमुख डॉ.कपिल झिरपे तसेच मेडिसिन विभागाच्या प्रमुख डॉ. निर्मला कॅस्टेलिनो उपस्थित होते.

उच्च रक्तदाब हा भारतातील सर्वात गंभीर आणि कुठल्याही ठोस लक्षणांशिवाय वाढणाऱ्या आरोग्य समस्यांपैकी एक मानला जातो. जागतिक आरोग्य संघटनेच्या भारतातील आकडेवारीनुसार, सुमारे २२ कोटी भारतीय उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत; मात्र त्यापैकी केवळ १२ टक्के रुग्णांचा रक्तदाब नियंत्रणात आहे. सार्वजनिक आरोग्याशी संबंधित अंदाजानुसार, भारतातील प्रत्येक चार प्रौढांपैकी एक व्यक्ती उच्च रक्तदाबाने प्रभावित आहे. यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, मूत्रपिंडाचे आजार आणि अकाली मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. बैठी जीवनशैली, ताणतणाव, अयोग्य आहार, लठ्ठपणा, धूम्रपान, मद्यपान आणि शारीरिक





हालचालींचा अभाव यांसारख्या कारणांमुळे तरुणांमध्येही उच्च रक्तदाबाचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याचे डॉक्टर नमूद करत आहेत .

या वाढत्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी रुबी हॉल क्लिनिक तर्फे १२० लाल फुग्यांची आकर्षक रचना तयार करण्यात आली होती. अनियंत्रित उच्च रक्तदाबामुळे भारतात दररोज होणाऱ्या मृत्यूंचे प्रतीक म्हणून ही फुग्यांची रचना उभारण्यात आली होती. रुग्णांचे नातेवाईक, भेट देणारे नागरिक, डॉक्टर, आरोग्यसेवा कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांनी फुगे फोडून या उपक्रमात सहभाग घेतला. वेळेवर निदान आणि नियमित रक्तदाब तपासणीमुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, हा संदेश या कृतीतून देण्यात आला. या उपक्रमासोबतच रुग्णालय परिसरात मोफत रक्तदाब तपासणी कक्ष (स्क्रिनिंग बूथ्स) उभारण्यात आले होते. ज्यांचा रक्तदाब सामान्य आढळला, त्यांना फुगे फोडण्याची संधी देण्यात आली तसेच वेलनेस गिफ्ट्स देऊन गौरविण्यात आले. ज्या व्यक्तींचा रक्तदाब वाढलेला आढळला, त्यांना समुपदेशन करण्यात आले आणि पुढील वैद्यकीय तपासणी तसेच जीवनशैलीविषयक मार्गदर्शनासाठी हेल्थ कूपन्स देण्यात आली .

या उपक्रमाबाबत बोलताना रुबी हॉल क्लिनिक येथील न्युरो-इंटेन्सिव्ह केअर युनिटचे प्रमुख डॉ. कपिल झिरपे म्हणाले, "उच्च रक्तदाबाला 'सायलेंट किलर' म्हटले जाते, कारण बहुतेक व्यक्तींना गंभीर गुंतागुंत निर्माण होईपर्यंत या आजाराची जाणीव होत नाही. आजच्या काळात अधिक चिंतेची बाब म्हणजे ताणतणाव, बैठी जीवनशैली, अयोग्य आहार आणि व्यायामाचा अभाव यामुळे तरुणांमध्येही उच्च रक्तदाबाचे प्रमाण वाढत आहे. एक साधी रक्तदाब तपासणी देखील जीव वाचवू शकते, हा संदेश आम्हाला 'चेक टुडे फॉर अ बेटर टुमॉरो' या मोहिमेद्वारे लोकांपर्यंत पोहोचवायचा आहे."

## 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या मंचावर ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांना मानवंदना

पुणे (दै. संध्या)

सोनी मराठी वाहिनीवरील प्रेक्षकांचा लाडका विनोदी कार्यक्रम 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' नेहमीच प्रेक्षकांना खळखळून हसवत असतो. पण याचबरोबर मनोरंजन क्षेत्रातील ज्येष्ठ आणि दिग्गज कलाकारांचा सन्मान करण्याची परंपराही या कार्यक्रमाने जपली आहे. येत्या भागात 'देऊळ बंद २' चित्रपटाची संपूर्ण टीम आपल्या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या मंचावर उपस्थित राहणार आहे.

या विशेष भागात मराठी चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्रात आपल्या दमदार अभिनयाने अमिट ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांना 'सोनी मराठी' आणि 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' तर्फे मान वंदना देण्यात आली. वयाच्या ८० व्या वर्षीदेखील मोहन जोशी आजही अभिनय क्षेत्रात सक्रिय असून त्यांच्या प्रभावी भूमिका प्रेक्षकांच्या कायम लक्षात राहिल्या आहेत.



'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मध्ये जेव्हा जेव्हा उद्योगातील ज्येष्ठ कलाकार उपस्थित राहतात, तेव्हा त्यांचा सन्मान करण्याची परंपरा कार्यक्रमाने कायम ठेवली आहे. याच परंपरेचा भाग म्हणून निर्माता-दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांनी 'सोनी मराठी' आणि 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या वतीने मोहन जोशी यांचा विशेष सत्कार केला. यावेळी हास्यजत्रेची संपूर्ण टीम आणि सर्व कलाकार मंचावर उपस्थित होते. सर्व कलाकारांनी मानाचा मुजरा करत मोहन जोशी यांना अभिवादन केले.

यावेळी भावना व्यक्त करताना मोहन जोशी म्हणाले, 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा एक अल्टिमेट कार्यक्रम आहे. इथले सगळे कलाकार एकापेक्षा एक आहेत. उत्तम कलाकार, उत्तम लेखक आणि दिग्दर्शक सचिन गोस्वामी हे देखील तितकेच दिग्गज आहेत. हा कार्यक्रम असाच सुरू राहणार आणि या कार्यक्रमाला कधीच पर्याय नाही, हे नक्की."

## नाशिक- पुणे हायस्पीड रेल्वे मार्ग जनतेच्या हक्काचा - आमदार सत्यजित तांबे

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या उद्योग ,शिक्षण, कृषी आणि रोजगार क्षेत्राला गती देण्याची क्षमता असलेला पुणे नाशिक सरळ रेल्वे मार्ग हा प्रकल्प साकारण्यासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली या भागातील जनतेने मोठा पाठपुरावा केला आहे. मात्र केंद्राच्या नव्या निर्णयाने हा मार्ग डावलून आता अहमदाबाद धानोरा रेल्वे मार्गाला पहिला सेमी हाय स्पीड रेल्वे मार्ग म्हणून प्राधान्य दिले आहे यामुळे नाशिक पुणे रेल्वे मार्ग होतो की नाही ही शंका निर्माण झाल्या असून हा मार्ग या भागातील जनतेच्या हक्काचा असल्याने या रेल्वे मार्गासाठी संघर्ष करणार असल्याचे आमदार सत्यजित तांबे यांनी म्हटले आहे

नाशिक पुणे रेल्वे ऐवजी गुजरात मधील अहमदाबाद धोलेरा या पहिल्या सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाला केंद्र सरकारने मंजुरी दिल्यानंतर आमदार सत्यजित



तांबे यांनी नाशिक पुणे रेल्वे बाबत मागणी करत आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. यावेळी ते म्हणाले की लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने देशातील पहिला सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग असलेला नाशिक पुणे रेल्वे नाशिक सिन्नर संगमनेर नारायणगाव राजगुरुनगर चाकण पुणे या मार्गाने मंजूर केला. 2018 मध्ये या प्रकल्पाला मान्यता मिळाली. या मार्गासाठी संगमनेर तालुक्यासह जुन्नर तालुक्यातील आज जमिनीचे अधिग्रहणही करण्यात आले. सुमारे 230 कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले गेले. रेल्वे संगमनेर या सरळमार्गे होणार असल्याने या भागातील नागरिक शेतकरी व युवक वर्ग मोठा आनंदित होता.

मात्र मध्यंतरी सरकारने शिर्डी अहिल्यानगर आणि पुणे असा मार्ग केल्याने या मार्गावरील सर्व तालुक्यांमध्ये मोठी नाराजी पसरली. सर्व लोकप्रतिनिधी सह सर्वांनी एकत्रित येऊन संघर्ष केला. याबाबत लोकनेते मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन हा रेल्वे मार्ग सरळ व्हावा याबाबत विनंती केली. त्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिसादही दिला. आपण वेळोवेळी विधानपरिषदेमध्ये नाशिक रेल्वे बाबत आवाज उठवला. मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. या मार्गावरील सर्व लोकप्रतिनिधींना एकत्र घेऊन हा मार्ग सरळ मार्गे व्हावा यासाठी सरकारला विनंती केली.

## रामवाडी मेट्रो ते खराडी आयटी पार्क मार्गावर सुरू आहे प्रवाशांच्या जीवाशी खेळ

पुणे (दै. संध्या)

पुणे शहरातील रामवाडी मेट्रो स्टेशन ते खराडी आयटी पार्क या मार्गावर धावणाऱ्या सहा आसनी रिक्षाचालकांकडून नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे समोर आले आहे. सहा प्रवाशांची क्षमता असलेल्या या रिक्षांमध्ये तब्बल दहा प्रवासी दाटीवाटीने बसवून वाहतूक केली जात आहे. मात्र, या मार्गावर वारंवार आणि स्वस्त सार्वजनिक वाहतुकीचा दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने प्रवाशांना जीव धोक्यात घालूनही प्रवास करावा लागत आहे. या मार्गावर सहा आसनी रिक्षाच्या एका सीटसाठी २५ रुपये भाडे आकारले जाते. आरटीओच्या नियमांची पायमल्ली होत असूनही प्रभावी कारवाई होत नसल्यामुळे या रिक्षांचे चालक आपल्याला प्रवाशांच्या जीवापेक्षा २५ रुपये महत्वाचे असल्याच्या थाटात बिनधास्तपणे रिक्षा दामटत असतात. कल्याण-मुरबाड-अहिल्यानगर महामार्गावरील रायते पुलावर मागील महिन्यात प्रवासी कोंबून भरलेल्या इको टॅक्सीच्या (काळी-पिवळी) गंभीर अपघातात ११ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला होता. नियमबाह्य रिक्षा वाहतूक न रोखल्यास पुण्यातही अशीच घटना घडू शकते. प्रत्यक्ष पाहणी केली असता या मार्गावर सहा आसनी रिक्षाचालकांकडून क्षमतेपेक्षा सर्रास अतिरिक्त प्रवासी घेतले जात असल्याचे दिसून आले. याबाबत एका रिक्षाचालकाला विचारणा केली असता त्याने उद्धटपणे उत्तर दिले, "तुम्हाला अडचण असेल तर खाली उतरा. इतर कुणालाच समस्या नाही, मग तुम्हीच का त्रास करून घेताय? या मार्गावर सहा आसनी रिक्षांचा अपघात झालेला तुम्ही पाहिला आहे का? एका सीटवर चार जण सहज बसू शकतात." या रिक्षांमध्ये मागील बाजूस आठ जण तर चालकाजवळ दोन जण बसवले जात असल्याचे दिसून आले. या चालकांना कायद्याची कोणतीही भीती नसल्याचे दिसून आले. रामवाडी मेट्रो स्टेशनवर एका प्रवाशाने सांगितले की, काही रिक्षाचालक प्रवासी बसवल्यानंतर मध्येच रिक्षा थांबवून पानटपरीवर जातात आणि पाच ते सात मिनिटे प्रवाशांना वाट पाहायला लावतात. मात्र, चालक परत आल्यानंतर एकही प्रवासी त्याला जाब विचारू शकत नाही.


# धार येथील 'भोजशाळा' हे हिंदू मंदिरच

### मंदिर मुक्तीच्या लढ्याला आणखी एक ऐतिहासिक यश!

पुणे (दै. संध्या)

मध्यप्रदेशातील धार येथील ऐतिहासिक 'भोजशाळा' हिंदूंचेच पवित्र श्री वाग्देवी (श्री सरस्वती) मंदिर आहे, यावर इंदूर उच्च न्यायालयाने कायद्याची आणि पुराव्यांची मोहर उमटवली आहे. हा निकाल म्हणजे केवळ एका वास्तूचा विजय नसून शतकानुशतके दडपल्या गेलेल्या ऐतिहासिक सत्याचा आणि परकीय इस्लामी आक्रमकांनी अतिक्रमित केलेल्या मंदिरांच्या मुक्ती लढ्याचा भव्य विजय आहे. भोजशाळेच्या मुक्तीचा लढा आज यशस्वी झाला असला, तरी या संघर्षात मोठा सहभाग हा "भोजशाळा मुक्ती आंदोलनाचे" प्रमुख श्री. नवलकिशोर शर्मा आणि हिंदु जनजागृती समिती यांचा होता. समिती या ऐतिहासिक निर्णयाचे सहर्ष स्वागत करते आणि '... अब काशी-मथुरा बाकी हैं!' ची संकल्प घोषणा करत आहे.


धार येथील भोजशाळेच्या मुक्तीसाठी हिंदु जनजागृती समितीने केवळ रस्त्यावर आंदोलने



केली नाहीत, तर राष्ट्रीय स्तरावर व्यापक जनजागृती केली. गोवा येथे होणाऱ्या 'वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सव' (अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशन) या राष्ट्रीय व्यासपीठावरून दरवर्षी या संदर्भात कायदेशीर आणि धोरणात्मक ठराव मंजूर करून लढ्याची दिशा ठरवली. देशभरातील हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी मध्यप्रदेश सरकार आणि केंद्र सरकारकडे याविषयी सातत्याने दाद मागितली होती. आज न्यायालयाने दिलेल्या या ऐतिहासिक निर्णयामुळे कोट्यवधी हिंदूंच्या भावनांना आणि समितीच्या प्रदीर्घ आंदोलनाला न्याय मिळाला आहे.

या प्रसंगी समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी स्पष्ट केले की, भारतातील हिंदूंची केवळ एक-दोन देवस्थाने आक्रमित झालेली नाहीत. परकीय आक्रमकांनी आणि धार्मिक कट्टरतावाद्यांनी हिंदूंच्या सहिष्णुतेचा फायदा घेऊन हजारो मंदिरांवर अनधिकृतपणे अतिक्रमणे केली आणि त्यावर स्वतःचा खोटा अधिकार सांगितला.

अयोध्या आणि धार (भोजशाळा) येथील निकालांनी हे सिद्ध केले आहे की, असत्याचा बुरखा फार काळ टिकत नाही. आता वेळ आली आहे की काशीच्या ज्ञानवापीपासून ते मथुरेच्या श्रीकृष्ण जन्मभूमीपर्यंतची सर्व आक्रमित क्षेत्रे मुक्त झाली पाहिजेत."



## पुण्यातील दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा शिरवता धरणात बुडून मृत्यू

पुणे (दै. संध्या)

मावळ तालुक्यातील शिरवता धरण परिसरात फिरण्यासाठी आलेल्या सहा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पर्यटनस्थळी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात शिक्षण घेणारे सहा विद्यार्थी पर्यटनासाठी शिरवता धरण परिसरात आले होते. धरणाच्या पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघांचा तोल जाऊन ते खोल पाण्यात बुडाले. या दुर्घटनेत आर्या सुशांत बांदावर (वय २०, रा. गोंदिया) आणि करण ज्ञानदेव ठोंबरे (वय १९, रा. सातारा) यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वन्यजीव रक्षक मावळ संस्थेची आपत्ती व्यवस्थापन टीम तसेच शिवदुर्ग मित्र लोणावळा संस्थेचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक ग्रामस्थांनी तत्परता दाखवत दोन्ही युवकांना पाण्याबाहेर काढून रुग्णवाहिकेतून कामशेत येथील रुग्णालयात हलविले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले. यानंतर दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी तळेगाव दाभाडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. या प्रकरणाची नोंद कामशेत पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे दरम्यान, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धरण परिसरातील पाण्याची पातळी आणि खोली वाढलेली असल्याने पर्यटकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### उषा चव्हाण यांनी परत केले शासकीय पुरस्कार; नेमकं कारण काय?

मुंबई (दैनिक संध्या) : सोंगाड्या, पांडू हवालदार, पळवा पळवी अशा असंख्य सुपरहिट चित्रपटांमध्ये सदाबहार काम करणाऱ्या उषा चव्हाण यांनी त्यांच्या जीवनगौरव पुरस्कारासहित शासकीय पुरस्कार परत केला आहे. ठाण्यातील आनंद दिघे यांच्या आनंद आश्रम येथे त्यांनी हे पुरस्कार अर्पण केले आहेत. जमिनीच्या वादातून बिल्डर आणि पुणे पालिकेने त्यांची फसवणूक केल्याच्या आरोपातून त्यांनी असा निर्णय घेतला. याबाबत त्यांनी आज टीव्ही ९ मराठीशी संवाद साधला. पुण्यातील धनकवटी सर्वे क्रमांक १३ या जमिनीबाबत उच्च न्यायालयाने निर्णय दिला असून या मालमत्तेच त्यांच्या मुलाचा म्हणजेच हृदयनाथ यांचा हिस्सा आहे. मात्र, पुणे महानगरपालिकेने चुकीच्या पद्धतीने टीडीआर मंजूर करून गोयल यांना परस्पर हिस्सा देऊन टाकला आहे, असा दावा उषा चव्हाण यांनी केला. "याबाबत चौकशीकरता माझा मुलगा गेला असता त्याला अपमानास्पद वागणूक देण्यात आली", असंही त्यांनी सांगितलं. त्या पुढे म्हणाल्या, "मी त्याला बोलले की आपण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जाऊया. कारण हे खातं त्यांच्याकडे आहे. टीडीआर आमचा चोरला असून २२ वर्षे आम्ही लढतो आहे. मी माझ्या सासूबरोबर तिथे गहू बाजरी काढली आहे. काही लोकांनी आमचा हिस्सा आम्हाला दिला. पण आम्ही खोटं बोलतोय असं म्हटलं जातंय. आम्हाला खोटं बोलायचं असतं तर आम्ही येथे या पवित्र जागी आलोच नसतो. आमची सत्याची बाजू आहे." "धनकवटी सर्वे नंबर १३ येथे काही नव्हतं, तिथे आम्ही शेती करत होतो. त्यानंतर तिथे बांधकाम झाले. सर्वे नंबर १३ मध्ये जागेचा डीटीआर आहे, परस्पर विकला गेला आहे. सर्व गुपित ठेवलं आहे. या लोकांनी परस्पर १०० टक्के टीडीआर देऊन टाकला आहे", असंही त्या म्हणाल्या. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून त्यांची भेटही घेणार आहेत. त्या मूळच्या शिवसैनिक असून त्यांना येथे नक्की न्याय मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### 'नीट' परीक्षा पेपरफुटीप्रकरणी आता पालकांची चौकशी!

पुणे (दैनिक संध्या) : 'नीट'परीक्षा पेपरफुटीचे धागेदोरे आता महाराष्ट्रात आणखी खोलवर पसरल्याचे समोर येत आहे. पुणे, नाशिक, अहिल्यानगर, लातूर आणि बीडनंतर आता केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) आपला मोर्चा नांदेडकडे वळवला आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी शुभम खैरनार याच्याशी संबंधित असलेल्या नांदेडमधील एका कुटुंबाची सीबीआयच्या पथकाकडून कसून चौकशी सुरू आहे. नाशिकमधून अटक करण्यात आलेला आरोपी शुभम खैरनार आणि नांदेडमधील एका कुटुंबाचे थेट कनेक्शन असल्याचे सीबीआयच्या तपासात समोर आले आहे. नांदेडच्या विद्युत नगर भागात राहणाऱ्या या कुटुंबाने 'नीट' परीक्षेचे लीक झालेले कथित 'गेस पेपर्स' खरेदी केल्याचा संशय यंत्रणेला आहे. या कुटुंबातील दोन मुले यंदा नीट परीक्षेची तयारी करत होती. रविवार सकाळपासूनच सीबीआयचे पथक या कुटुंबाच्या घरी ठाण मांडून असून, सदस्यांची कसून चौकशी केली जात आहे. दुसरीकडे, या रॅकेटचे मूळ शोधण्यासाठी सीबीआयच्या दुसऱ्या एका पथकाने आरोपी शुभम खैरनारच्या पुण्यातील कार्यालयावर छापेमारी केली. मध्यस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत लीक झालेला पेपर कसा पोहोचवला गेला, याचा शोध सीबीआय घेत आहे. या संपूर्ण प्रकरणाचे धागेदोरे थेट 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (NTA) च्या अंतर्गत यंत्रणेपर्यंत पोहोचले आहेत. सीबीआयने रविवारी दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टात आरोपी मनीषा गुरुनाथ मांढरे हिला हजर करून १४ दिवसांची कोठडी मागितली. मनीषा मांढरे ही 'एनटीए'च्या तज्ज्ञ समितीची सदस्य होती आणि तिने परीक्षेदरम्यान अनुवादक (Translator) म्हणूनही काम केले होते. "एनटीएची संपूर्ण परीक्षा पद्धतच सध्या तपासाच्या फेऱ्यात आहे. आरोपी मनीषा मांढरे हिने पेपर लीक करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून मोठी रक्कम घेतल्याचे स्पष्ट झाले असून, या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांची चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे." संरक्षण पक्षाने या कोठडीला विरोध केला. मांढरे यांच्या घरातून कोणतीही जप्ती झालेली नाही आणि त्यांनी यापूर्वीच तपासात सहकार्य केले आहे, असा युक्तिवाद त्यांच्या वकिलांनी केला. मांढरे हिला मथुरेतील एका हॉटेलमधून ताब्यात घेण्यात आले होते.



### सीबीएसई शाळांमध्ये यंदापासूनच तिसरी भाषा लागू... पण बोर्डाची परीक्षा नाही!

पुणे (दैनिक संध्या) : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) २०२६-२७या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांना तिसरी भाषा शिकणे अनिवार्य केले आहे. त्यापैकी दोन भाषा या स्थानिक भारतीय भाषा असणे आवश्यक आहे. तसेच, तिसऱ्या भाषेचे मूल्यमापन शाळास्तरावरच केले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. 'सीबीएसई' च्या शैक्षणिक प्रमुख डॉ. प्रज्ञा सिंग यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. 'सीबीएसई'ने महिनाभरापूर्वी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात इयत्ता सहावीपासून तिसरी भाषा अनिवार्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, आता नव्या परिपत्रकानुसार १ जुलै २०२६ पासूनच इयत्ता नववीला तिसरी भाषा लागू असल्याचे जाहीर केले आहे. परदेशी भाषा शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर दोन भारतीय भाषा शिकणे आवश्यक आहे. अन्यथा, चौथी भाषा म्हणूनही परदेशी भाषा शिकता येणार आहे, असे नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्याच्या दृष्टीने तिसऱ्या भाषेचे मूल्यमापन पूर्णपणे शाळास्तरावर अंतर्गत पद्धतीने होईल. विद्यार्थ्यांची तिसऱ्या भाषेतील कामगिरी प्रमाणपत्रात नमूद करण्यात येईल. तसेच, तिसऱ्या भाषेमुळे कोणत्याही विद्यार्थ्याला दहावीला बोर्डाची परीक्षा देण्यापासून रोखले जाणार नाही. नमुना प्रश्नपत्रिका आणि अंतर्गत मूल्यमापनासाठीचे निकष लवकरच उपलब्ध करून दिले जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. 'सीबीएसई' च्या विषय यादीतील कोणतीही भाषा निवडण्याची मुभा शाळांना देण्यात आली आहे. मात्र, तीन भाषांपैकी दोन भाषा स्थानिक भारतीय भाषा असणे आवश्यक आहे. 'तुलनात्मक विश्लेषणानुसार माध्यमिक स्तरातील तिसरी भाषा आणि मध्यम स्तरातील भाषा कौशल्यांमध्ये (मौखिक संवाद, वाचन. उपलब्ध होईपर्यंत इयत्ता नववीतील साम्य आहे. त्यामुळे तिसऱ्या भाषेसाठीची स्वतंत्र पाठ्यपुस्तके जागरूकता) सुमारे ७५ ते ८० टक्के (पान १ वरून) आकलन, लेखी अभिव्यक्ती आणि व्याकरण विद्यार्थ्यांनी निवडलेल्या तिसऱ्या भाषेची इयत्ता सहावीची पाठ्यपुस्तके (२०२६-२७ आवृत्ती) वापरावीत. माध्यमिक स्तरासाठी अपेक्षित कौशल्ये विकसित करण्यासाठी शाळांनी लघुकथा, कविता, माहितीपर लेखन अशा साहित्याचा पूरक साहित्य म्हणून वापर करावा,' असे पत्रकात नमूद केले आहे. 'पूरक साहित्याची निवड, अध्यापनासंबंधीत सविस्तर मार्गदर्शक सूचना १५ जूनपर्यंत उपलब्ध होतील. १९ अनुसूचित भारतीय भाषांमधील इयत्ता सहावीची तिसऱ्या भाषेची पाठ्यपुस्तके १ जुलैपूर्वी शाळांना उपलब्ध होतील.

# अर्धापूरकर यांचा तब्बल २९६ मताधिक्याने अध्यक्षपदी विजय

## अधिवक्ता एकता पॅनलने प्रचंड बहुमताने ऐतिहासिक विजयाने मारली बाजी



नांदेड (दै. संध्या) :

नांदेड जिल्हा अधिवक्ता संघटनेच्या २०२६-२८ च्या कार्यकारिणीच्या निवडणुकीत अत्यंत चुरशीच्या लढतीनंतर अखेर निकाल जाहीर झाला असून अध्यक्षपदी ॲड. यदुपत श्यामसुंदरराव देशमुख अर्धापूरकर यांनी दणदणीत विजय मिळवला. एकूण १७८२ मतांपैकी अर्धापूरकर यांना ९५७ मते मिळाली, तर शैलेश देशमुख यांना ६६१ आणि जगजीवन भेदे यांना १४६ मते मिळाली.अध्यक्ष पदामध्ये ॲड. यदुपत अर्धापूरकर हे तब्बल २९६ च्या मताधिक्याने विजयी होवून त्यांनी नांदेड अधिवक्ता संघाच्या निवडणुकीत नवा इतिहास घडवला आहे.उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या लढतीत ॲड.संगमेश्वर देलमडे यांनी ७२८ मते मिळवत विजय संपादन करून त्यांच्या विरोधातॲड.महिंद वावळे यांना ५१९ तर ॲड.निरज भोसीकर यांना ४५६ मते मिळाली. महिला उपाध्यक्ष पदावर ॲड. दीपाली डोंनगांवकर यांनी ७५९ मतांसह विजय मिळवला तर ॲड. विजयमाला मनवर यांना ६१५ व ॲड.ज्योती सूर्यवंशी यांना ३५० मते मिळाली.सचिव पदासाठी ॲड. कपिल पाटील यांनी ७०९ मते मिळवत विजय मिळवला तर ॲड. ज्ञानेश्वर देशमुख यांना ३९५,ॲड. रविंद्र पाटील यांना ३३० आणि ॲड.मंगेश वाघमारे यांना २९९ मते मिळाली.सहसचिव पदावर ॲड. जगदीश हाके यांनी ६६४ मतांसह विजय संपादन केला तर ॲड. जावेद पठाण यांना ४६८ ॲड. चंद्रमुनी सोनसळे यांना ३२४ व ॲड.तहूर पठाण यांना २५७ मते मिळाली. महिला सहसचिव पदावर ॲड. सुजाता बगाटे यांनी ७७८ मते मिळवत विजय मिळवला तर ॲड. वृशाली जोशी यांना ३५८, ॲड. वनिता बोईनवाड यांना ३३२ व ॲड. नगमा सिद्दीकी यांना २४५ मते मिळाली.कोषाध्यक्ष पदावर ॲड. मंगेश जामनिक यांनी ६९८ मते मिळवत विजय मिळवला तर ॲड. फेरोज पठाण यांना ४७५,ॲड. विष्णू पाटील यांना ३९३ व ॲड. शिवकांत किरवले यांना १४७ मते मिळाली.विशेष सहाय्यक पदासाठी ॲड.प्रदीप राठोड यांनी ५७३ मते मिळवत विजय मिळवला तर ॲड. जयेश पाटील यांना ५४३,ॲड. गौतम किन्नीकर यांना ४१० व ॲड. गणेश जाधव यांना १८३ मते मिळाली.सदस्य पदी विजयी झालेले उमेदवार ॲड.पवार मुक्ताई नारायणराव ९१२ मते,ॲड.गावंडे बाबू धर्माजी ८३८ मते,ॲड. मठवाले रामसिंघ पुरणसिंघ ७९२ मते,ॲड. पुंडगे रिना सतीश ७९२ मते,ॲड. हटकर प्रिती ७६३ मते, ॲड. बोकारे कार्तिक नितीनराव ७१९ मते,ॲड. येरेकर सुमेध बळीराम ७१९ मते,ॲड. बडो उषा सुरेशराव ७१२ मते,ॲड.हटकर सटवाजी व्यंकटराव ६७९ मते,ॲड. सोलगे (पाटील) गंगासागर ६७३ मते

ॲड.राठोड संकेत दिलीपराव ६६० मते अशी असून निवडणुकीची मतमोजणी तब्बल ७२ फेऱ्यांनंतर पूर्ण झाली व निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी फटाके,ढोल,ताशांचा जल्लोष करत अभिनंदनाचा वर्षाव केला. नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाच्या निवडणुकीत ॲड.यदुपत अर्धापूरकर यांचा तब्बल २९६ मताधिक्याने अध्यक्षपदी विजय झाल्याने वकिल संघाच्या निवडणूकीत हा एक ऐतिहासिक रेकॉर्ड ब्रेक झाला असून अधिवक्ता एकता पॅनलने प्रचंड बहुमताने ऐतिहासिक विजयाची बाजी मारली असून या संपूर्ण पॅनलचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून पुढील नाविन्यपूर्ण उपक्रम व कार्यास खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या.

## बारव संवर्धनाला प्राधान्य देत अतिक्रमण हटाव मोहीम राबवा

मुंबई (दै. संध्या) :

- मंत्री ॲड. आशिष शेलार
- बारव संवर्धन समितीची बैठक



राज्यातील ऐतिहासिक बारवांचे जतन व संवर्धन करण्यास पुरातत्व विभागाने प्राधान्य द्यावे, यासाठी कृती कार्यक्रम तयार करावा तसेच बारव परिसरातील अतिक्रमणे हटविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्याचे नियोजन करावे, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

राज्य शासनाने स्थापन केलेल्या बारव संवर्धन समितीची बैठक मंत्री ॲड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्यासह बारव बचाव मोहीमेचे प्रतिनिधी रोहन काळे, अभ्यासक डॉ. पराग सदगीर, डॉ. चंद्रकांत रागिट, सुभाष शिंदे, श्रीनिवास वडगबळाकर, सुभाष शिंदे, श्रीकांत उमरीकर, प्रमोद कुलकर्णी, सौरभ जामकर, अरविंद कडबे, ॲड. धायगुडे, भागवत मसणे आदी उपस्थित होते.

बैठकीत बारव संवर्धनाच्या कामात येणाऱ्या अडचणी, आवश्यक उपाययोजना तसेच शासन आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील समन्वयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. समिती सदस्यांनी विविध सूचना मांडल्या.

यावेळी मंत्री ॲड.शेलार यांनी बारव संवर्धनासाठी कार्यपद्धती निश्चित करणारे परिपत्रक जारी करण्याच्या सूचना दिल्या. समिती सदस्यांचा सहभाग, जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय, जिल्हा नियोजन निधीतून करण्यात येणाऱ्या कामांमध्ये पुरातत्व संवर्धनाचे निकष पाळणे, समितीच्या नियमित बैठकींचे वेळापत्रक निश्चित करणे आदी बाबींवर भर देण्यात यावा, असे त्यांनी सांगितले. तसेच बारव संवर्धनासाठी कार्यरत संस्था, अभ्यासक, विद्यार्थी आणि स्वयंसेवी घटक यांना प्रशिक्षण देण्यासाठी विशेष कार्यशाळा व शिबिरे आयोजित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यासाठी प्रशिक्षण क्षेत्रातील अनुभवी संस्थांचे सहकार्य घेण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या.

## रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करा

मुंबई (दै. संध्या) :

- ग्रामीण भागातील रुग्णांना 'गोल्डन अवर'मध्ये अत्याधुनिक उपचार देण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबवण्याचा विचार




मंत्री प्रकाश आबिटकर

ग्रामीण भागातील स्ट्रोक रुग्णांना 'गोल्डन अवर' मध्ये तातडीने आणि अत्याधुनिक उपचार देण्यासाठी 'रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन' हा दूरस्थ पद्धतीने रोबोटिक उपचार सुविधा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. गेल्या काही वर्षात स्ट्रोक (पक्षाघात) रुग्णसंख्येत वाढ होत आहे. अशा रुग्णाना 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशावेळी तज्ज्ञ डॉक्टर व आधुनिक सुविधा वेळेत न मिळाल्यास रुग्णाला कायमस्वरूपी पक्षाघाताचा धोका वाढतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन तालुका व जिल्हास्तरीय शासकीय रुग्णालयांमध्ये स्थानिक पातळीवरच अत्याधुनिक 'रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन' उपचार सुविधा उपलब्ध करून देण्याचा आरोग्यमंत्र्यांचा मानस आहे. आरोग्यसेवा आयुक्तालयात आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली त्या अनुषंगाने प्राथमिक बैठक झाली. बैठकीला खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार उमा खापरे, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान आयुक्त डॉ. सुनील भोकरे, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, केईएमचे वरिष्ठ हायब्रीड न्यूरोसर्जन डॉ. नितीन डांगे उपस्थित होते.

मुंबईतील केईएम रुग्णालयात रोबोटिक तंत्रज्ञानाद्वारे स्ट्रोक रुग्णांवर उपचार करण्याची सुविधा चाचणी सन 2020 मध्ये करण्यात आली होती. डॉ. नितीन डांगे आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागात ही सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विचार सुरू आहे. ही योजना कार्यान्वित झाल्यास ग्रामीण भागातील रुग्णांना 'हब आणि स्पोक' प्रणाली द्वारे 'रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन' सुविधा देण्यात येणार आहे.

संकल्पनेनुसार मुंबईतील केईएम येथे मुख्य रोबोटिक नियंत्रण केंद्र (Hub) कार्यरत असेल, तर जिल्हा व तालुकास्तरीय रुग्णालयांमध्ये दुय्यम रोबोटिक प्रणाली (Spoke Centers) कार्यरत असतील. संगणकीय आणि दूरसंचार प्रणालीद्वारे हे दोन्ही घटक एकमेकांशी जोडले जातील. मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टर आपल्या नियंत्रण प्रणालीद्वारे ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये उपस्थित वैद्यकीय पथकाच्या मदतीने न्यूरोअँजिओग्राफी, स्ट्रोक इंटरव्हेन्शन प्रक्रिया पार पाडतील.

आरोग्य विभागाच्या वतीने राज्यात ११ ठिकाणी कॅथलॅब सुरू करण्यात येत आहेत. यापैकी पाच केंद्रांवर प्रायोगिक तत्वावर 'रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन' सुविधा सुरू करण्याचा विचार आहे. हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर ही योजना टप्प्याटप्प्याने राज्यभर विस्तारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले बहुतांश इन्फ्रास्ट्रक्चर सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उपलब्ध असून, अतिरिक्त खर्च मुख्यत्वे रोबोटिक यंत्रणेसाठी होणार आहे. 'टेलीमेडिसिन' आणि 'ई-संजीवनी' प्रणालीच्या माध्यमातून ही सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. याबाबत आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांनाही महानगरांप्रमाणे अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळाल्या पाहिजेत. स्ट्रोक रुग्णांसाठी 'गोल्डन अवर' अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे रुग्णांना मोठ्या शहरात हलविण्याऐवजी त्यांच्या जवळच्या शासकीय रुग्णालयात 'रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन' सारखी आधुनिक उपचार पद्धती उपलब्ध करून देण्याबाबत आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे.

## 'पूर्वांचल महोत्सव माटी ९ मुंबई'मधून भारतीय संस्कृती समृद्ध करण्याचे कार्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (दै. संध्या) :




महान असलेल्या भारतीय संस्कृतीला समृद्ध करण्यासाठी महाराष्ट्र आणि पूर्वांचलने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विविध प्रदेश, भाषा आणि परंपरांमध्ये एकात्मता निर्माण करून भारतीय संस्कृती अधिक समृद्ध करण्याचे कार्य 'पूर्वांचल महोत्सव माटी ९ मुंबई' सारख्या उपक्रमातून होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सांताक्रुझ येथे कलिना कॅम्पस येथे केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय,'माटी – ए पब्लिक ट्रस्ट' व 'कलिना विद्यापीठ' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात मुख्यमंत्री बोलत होते.

कार्यक्रमाला जम्मू काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा, सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार, खासदार जगदंबिका पाल, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु रविंद्र कुलकर्णी, माटी महोत्सवाचे आयोजक आसिफ आझमी, मॉडर्न ग्रुप कंपनीचे ज्ञानप्रकाश सिंह उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईमध्ये मिनी पूर्वांचल वसले आहे. चार ते पाच पिढ्यांपासून पूर्वांचलातील लोक महाराष्ट्रात स्थायिक झाले असून त्यांनी पूर्वांचलच्या मातीतल्या संस्कृतीच्या आठवणी जपल्या आहेत.'एक भारत, श्रेष्ठ भारत' पाहायचा असेल तर मुंबईतील पूर्वांचल समाजाकडे पाहावे. पूर्वांचल आणि महाराष्ट्र यांचे ऐतिहासिक नाते आहे. प्रभू श्रीरामांचे पंचवटीमध्ये वास्तव्य होते. येत्या काळात कुंभमेळ्यात पंचवटी बदललेली दिसेल, तसेच त्र्यंबकेश्वरही नव्या स्वरूपात पाहायला मिळेल. भारतीय ज्ञानपरंपरेत काशी-वाराणसीला सर्वात मोठे स्थान आहे. अकराव्या-बाराव्या शतकात भक्तीमार्गाचा प्रसार झाला. अनेक आक्रमणांनंतरही भारतीय संस्कृती नष्ट झाली नाही, कारण ती जिवंत ठेवण्याचे काम संतांनी केले. महाराष्ट्र आणि पूर्वांचलातील संतांनी समाजाला भक्तीमार्गावर आणत संस्कृतीचे जतन केले आहे. देशातील बंडाच्या सुरुवातीच्या काळात पूर्वांचलाने मंगल पांडे यांसारखे क्रांतिकारक दिले. पूर्वांचलमध्ये असलेले काशी ही भारताच्या संस्कृतीचे, अध्यात्माचे आणि ज्ञानपरंपरेचे सर्वात मोठे केंद्र असून गंगेच्या प्रवाहाइतकीच प्राचीन काशीची ज्ञानधारा आजही अखंडपणे वाहत आहे. भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेत काशीला अद्वितीय स्थान आहे.

# चिमुकल्या मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात शिवसेनेचा जनआक्रोश मोर्चा

येवलेवाडी (दै. संध्या) :




आंदोलनात शिवसेना पु पुणे शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे,मा.जिल्हा परिषद सदस्या स्वाती टकले, महिला आघाडी सहसंपर्कप्रमुख सुदर्शन त्रिगुनाईत,मा. नगरसेविका संगीता ठोसर, उपजिल्हाप्रमुख अमर घुले,पंकज कोद्रे,सुभाष घुले,दत्ता खवळे,सुहास पडवळ,प्रवीण हिलगे, शहर समन्वयक नवनाथ निवंगुणे,संदेश पावसकर,संदीप शिंदे,अभिजित बोराटे, अकबर शेख,अनिकेत सपकाळ,मार्तंडराज धंदुके,सचिन भानगिरे,प्रशांत डाबी,संतोष जाधव,तसेच शहरातील सर्व प्रमुख पदाधिकारी, महिला आघाडी, युवा सेना व विविध अंगीकृत संघटनांचे सदस्य, जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येवलेवाडी येथे चिमुकल्या मुलीवर तिच्याच आजोबांकडून झालेल्या अमानुष लैंगिक अत्याचाराच्या संतापजनक घटनेच्या निषेधार्थ तसेच पुणे शहरात अल्पवयीन मुलींवरील वाढत्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांविरोधात आज शिवसेना पुणे शहराच्या वतीने खडीमशीन चौक, कोंढवा येथे भव्य जनआक्रोश मोर्चा व आंदोलन करण्यात आले. शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात महिला आघाडी, शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "आरोपींना फाशी झालीच पाहिजे", "चिमुकल्यांवरील अत्याचार बंद झालेच पाहिजेत" अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. या आंदोलनावेळी उपस्थित महिलांनी संतप्त भावना व्यक्त करत पुणे शहरात चिमुकल्या मुलींवरील अत्याचारांच्या घटना सातत्याने वाढत असल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. नसरापूर, पर्वती आणि आता येवलेवाडी येथे समोर आलेल्या सलग घटनांनी पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून विकृत प्रवृत्तींमध्ये कायद्याची भीती उरली आहे का असा सवाल उपस्थित करण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी अशा नराधम आरोपींवर जलदगती न्यायालयामार्फत कठोरात कठोर कारवाई करून समाजासमोर धडकी भरवणारा संदेश देण्याची मागणी केली. यानंतर शिवसैनिकांनी खडीमशीन चौकातून येवलेवाडी पोलीस उपायुक्त कार्यालयाकडे मोर्चा काढत ठिय्या आंदोलन केले. या वेळी मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी करत पुणे शहरातील अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र विशेष यंत्रणा उभारण्याची मागणी केली. संवेदनशील भागांमध्ये वाढीव पोलिस गस्त, शाळा परिसरात विशेष सुरक्षा व्यवस्था आणि लैंगिक अत्याचार प्रकरणांमध्ये झिरो टॉलरन्स धोरण राबवण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. यावेळी बोलताना शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी सांगितले की, पुणे शहरात चिमुकल्या मुलींवरील अत्याचारांच्या घटना ही अत्यंत गंभीर बाब असून समाजमन सुन्न करणारी परिस्थिती निर्माण झाली आहे. चिमुकल्या मुली स्वतःच्या घरात, नात्यात आणि परिसरात सुरक्षित नसतील तर ही केवळ गुन्हेगारीची बाब नसून समाजाच्या नैतिक अधःपतनाची धोकादायक घंटा आहे. पुणे पोलीस प्रशासनाने अशा प्रकरणांमध्ये कोणतीही दिरंगाई न करता कठोर कारवाई करावी, अन्यथा शिवसेना आणखी तीव्र आंदोलन उभारेल असा इशाराही त्यांनी दिला.

आरोपींना फाशीची शिक्षा मिळावी यासाठी न्यायालयीन प्रक्रियेत सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी येवलेवाडी प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली असून सर्व पुराव्यांसह गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

पिंपरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ कामगार कल्याण केंद्र उद्योग नगर च्या वतीने बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले कार्यक्रमाचे उद्घाटन प्रकाश चव्हाण गुणवंत कामगार तसेच पांडुरंग सामाजिक कार्यकर्ते या मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रशिक्षक स्वानंद राजपाठक (गुणवंत कामगार) यांनी कामगार व कामगार कुटुंबीय विद्यार्थ्यांना बुद्धिबळाचे सुरुवातीच्या महत्त्वाच्या चाली कुठल्या कराव्या, खेळातील पुढील डावपेच याचे नियोजन ,त्यामध्ये एन्ड पास कसा करावा, कॅसलिंग कसे करावे , चेकमेट कसा करावा. बोर्ड कसा लावावा बुद्धिबळ खेळताना आपल्यापेक्षा तरबेज असणाऱ्या विरुद्ध बुद्धिबळ खेळावे याचप्रमाणे बुद्धिबळाचा जीवनातही कसा वापर करता येतो याचे उत्तम उदाहरण स्वानंद राजपाठक यांनी दिले. कार्यक्रमाचे समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे मा. डॉक्टर मोहन गायकवाड कामगार भूषण, सौ सावली राजपाठक, तसेच राजेश गाढवे एमएसईबी युनियन प्रतिनिधी या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये समारोप संपन्न झाला प्रमुख पाहुणे डॉ. मोहन गायकवाड यांनी केंद्रात राबवीत असलेले उपक्रम व योजनांचे कौतुक केले त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी मनोगतामध्ये बुद्धिबळाचे कौशल्य व त्यामध्ये प्राविण्य कसे मिळवावे याची सखोल असे मार्गदर्शन राजपाठक सरांनी दिले त्याचप्रमाणे मंडळ चालवत असलेले उपक्रम असेच विविध उपक्रम राबवून आम्हा कामगारांना त्याचे ज्ञान अधिक अधिक मिळत राहो असेच आयोजन करावे, कार्यक्रमाची प्रास्ताविक व स्वागत प्रदीप बोरसे यांनी केले तर आभार अश्विनी दहिदुले यांनी मानले.

### पिंपळेगुरवमध्ये टोळक्याचा धिंगाणा; चारचाकी वाहनांची तोडफोड करून दहशत

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपळेगुरव येथील मोरया पार्क परिसरात गुरुवारी रात्री अज्ञात टोळक्याने धिंगाणा घालत पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या चारचाकी वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, मोरया पार्क परिसरातील नदीकाठी असलेल्या पार्किंगमध्ये गुरुवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास काही अज्ञात व्यक्तींनी अचानक प्रवेश करून उभ्या असलेल्या वाहनांवर दगडफेक व तोडफोड केली. या घटनेत तीन चारचाकी वाहनांच्या काचा फोडण्यात आल्या असून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या घटनेनंतर वाहनमालकांनी संताप व्यक्त केला असून परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान, या तोडफोडीचे काही व्हिडीओ समोर आले असून त्यामध्ये टोळक्याने केलेला धिंगाणा स्पष्टपणे दिसून येत आहे. ही घटना सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे.

### खडकवासल्यात 'हिट अँड रन', मोटारीच्या धडकेत चार वर्षांच्या बालकाचा मृत्यू

पिंपरी (दैनिक संध्या) : मद्यपी मोटारचालकाने वाहनांना धडक दिल्याची घटना खडकवासला भागात शनिवारी सायंकाळी घडली. भरधाव मोटारीच्या धडकेत दुचाकीवरील चार वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीस्वारासह त्याची पत्नी जखमी झाली. नागरिकांनी पसार होण्याच्या तयारीत असलेल्या मद्यपी मोटारचालकाला पकडले. त्याला चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी नांदेड सिटी पोलिसांनी मोटारचालकाला अटक केली. यशराज नीलेश कांबळे (वय ४, रा. धायरी) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. अपघातात दुचाकीस्वार नीलेश कांबळे (वय ३६) आणि त्यांची पत्नी जखमी झाली. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी नांदेड सिटी पोलिसांनी मद्यपी मोटारचालक अमोल गोरक्षनाथ गेगडे (वय ३६, रा. अहिल्यानगर) याला अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नीलेश कांबळे हे भाजीपाला विक्रेते आहेत. ते नऱ्हे भागात भाजीपाला विक्री व्यवसाय करतात. शनिवारी (१६ मे) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास दुचाकीस्वार कांबळे, त्यांचा मुलगा यशराज आणि पत्नी हे खडकवासल्याहून पुण्याकडे निघाले होते. खडकवासला भाजी मंडई परिसरात भरधाव मोटारीने कांबळे यांना पाठीमागून धडक दिली. त्यानंतर रस्त्याच्या कडेला लावलेल्या दुचाकी, तसेच चारचाकी वाहनाला मोटारीने धडक दिली. मोटार न थांबवता मोटारचालक अमोल हा पसार होण्याच्या तयारीत होता. अपघातानंतर खडकवासला भाजी मंडई परिसरात नागरिकांची गर्दी झाली. नागरिकांनी पाठलाग करून मोटारचालक अमोल याला पकडले. नागरिकांनी त्याला चोप दिला. त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. दरम्यान, अपघाताच्या घटनेनंतर परिसरात घबराट उडाली. गंभीर जखमी झालेल्या यशराजसह त्याच्या आई-वडिलांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांदरम्यान यशराजचा मृत्यू झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक कसबे तपास करत आहेत. आरोपी मोटारचालक अमोल याने मद्यप्राशन केल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी त्याला अटक केली.

### 'वृक्ष तिथे छाया, बुवा तिथे बाया', अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे हटके अभियान

पिंपरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्रामध्ये वाढत्या बुवाबाजी आणि अंधश्रद्धेच्या घटनांना आळा घालण्यासाठी आता अखिल भारतीय महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने कंबर कसली असून 'वृक्ष तिथे छाया... बुवा तिथे बाया' हे हटके अभियान राज्यभर राबवण्यास सुरुवात केली आहे.

संस्थेचे संस्थापक प्रा .श्याम मानव यांनी राज्यात 'वृक्ष तिथे छाया... बुवा तिथे बाया' हे विशेष जनजागृती अभियान सुरू केले आहे. या अभियानाद्वारे ते ठिकठिकाणी जाऊन भोंदूगिरी आणि त्यामागे लपलेली गुन्हेगारी उघड करत आहेत. याचाच एक भाग म्हणून पुण्यातही आज संध्याकाळी पाच वाजता टिळक स्मारक मंदिर येथे प्राध्यापक श्याम मानव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांच्या शोषणाला आळा घालण्यात यंत्रणा अपयशी ठरत आहे. राज्यात वाढणारी अंधश्रद्धा ही केवळ वैचारिक नसून ती एक सामाजिक विकृती बनत चालली आहे. ' असे मत त्यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत मांडले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'हरित व आत्मनिर्भर शहर'ची सुरुवात

## पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत महापौर रवि लांडगे यांचा पुढाकार

**पिंपरी (दै. संध्या)**



देशाचे आदरणीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी ऊर्जा बचत, स्वदेशी उत्पादनांचा वापर, सार्वजनिक वाहतूक, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीबाबत केलेल्या आवाहनाला तसेच राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांना प्रतिसाद देत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये व्यापक स्तरावर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा निर्णय मा. महापौर रवि लांडगे यांनी घेतला आहे.

या संदर्भात मा. महापौरांनी मा. आयुक्तांना पत्राद्वारे सूचना देत महापालिका प्रशासन, अधिकारी-कर्मचारी, नागरिक, शाळा, गृहनिर्माण संस्था, उद्योग आणि सामाजिक संघटनांच्या सहभागातून "हरित, ऊर्जा सक्षम आणि आत्मनिर्भर पिंपरी-चिंचवड" घडविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

महापौरांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांमुळे शहरात ऊर्जा बचत, इंधन बचत, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी उत्पादनांना चालना, नागरिकांचा सहभाग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यास मोठी मदत होणार आहे. विशेष म्हणजे प्रशासनातील दैनंदिन कामकाजातही पर्यावरणपूरक आणि खर्च बचतीच्या पद्धतींचा अवलंब करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत "हरित पिंपरी-चिंचवड आठवडा", "नो पॉवर अवर", "एक कर्मचारी – एक वृक्ष", ई-वाहन व चार्जिंग स्टेशन प्रोत्साहन, "वर्क फ्रॉम होम / व्हर्च्युअल मीटिंग" धोरण, "स्वदेशी बाजार – आत्मनिर्भर पीसीएमसी", पेपरलेस प्रशासन, "ऑईल फ्री हेल्दी कॅन्टीन", "सौर पिंपरी-चिंचवड" अभियान, "ग्रीन रेटिंग" स्पर्धा, "सायकल टू वर्क डे", नैसर्गिक शेती व टेरेस गार्डन प्रोत्साहन तसेच "हरित गणेशोत्सव / हरित उत्सव" यांसारखे महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

मा. महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, "देश आणि राज्य नेतृत्वाने दिलेला ऊर्जा बचत, पर्यावरण संवर्धन आणि स्वदेशीचा संदेश हा केवळ शासनाचा उपक्रम नसून तो प्रत्येक नागरिकाचा सहभाग असलेले जनआंदोलन व्हावे, हा आमचा प्रयत्न आहे. पिंपरी-चिंचवड शहर विकासासोबत पर्यावरण संरक्षणातही राज्यात आदर्श निर्माण करेल." महापौरांच्या या पुढाकारामुळे शहरात हरित ऊर्जा वापराला चालना मिळणार असून प्रदूषण कमी करणे, इंधन बचत, वृक्षसंवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे. यामुळे पिंपरी-चिंचवड शहर "स्मार्ट", "ग्रीन" आणि "सस्टेनेबल" शहर म्हणून राज्यात वेगळी ओळख निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## 'फक्त नावांचे ब्रँडिंग नको, शिवशाहीचा पारदर्शक कारभार हवा!'

**पिंपरी (दै. संध्या)**




पिंपरी-चिंचवड महापालिकेने आपल्या क्षेत्रीय कार्यालयांना महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे प्रतीक असलेल्या प्रतापगड, राजगड, सिंहगड आणि रायगड या गडकिल्ल्यांची नावे देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत करतानाच आम आदमी पार्टी युवक आघाडीने प्रशासन आणि सत्ताधारी भाजपवर जोरदार टीका केली आहे.

'आप' युवक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष ऋषिकेश कानवटे यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, "केवळ नावांचे ब्रँडिंग करून जनतेचे प्रश्न सुटत नाहीत. शिवरायांच्या नावाचा वापर राजकीय दिखाव्यासाठी करण्यापेक्षा, त्या कार्यालयांतून शिवशाहीप्रमाणे भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन मिळणे अधिक महत्त्वाचे आहे." महापालिकेच्या या निर्णयावर टीका करताना 'आप' युवक आघाडीने प्रशासनासमोर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. सामान्य नागरिकांना आजही साध्या कामांसाठी महापालिकेच्या कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दलाली, टक्केवारी आणि फाइल अडवून ठेवण्याच्या जुन्या पद्धती आजही सुरू असल्याचे सांगत, या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाकडे नेमके कोणते नियोजन आहे, असा सवाल करण्यात आला.

डिजिटल इंडियाच्या घोषणा होत असल्या तरी एका सहीसाठी नागरिकांना अनेकदा हेलपाटे मारावे लागतात. "कार्यालयाला गडकिल्ल्यांचे नाव देऊन उपयोग काय, जर त्याच कार्यालयात नागरिकांची पिळवणूक होत असेल?" असा प्रश्नही युवक आघाडीने उपस्थित केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या हितासाठी पारदर्शक आणि न्याय्य कारभार उभा केला होता. "रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका," अशी शिकवण देणाऱ्या शिवरायांच्या नावाने चालणाऱ्या कार्यालयांत जर भ्रष्टाचाराच्या तक्रारी होत असतील, तर तो शिवरायांच्या आदर्शांचा अपमान असल्याची भावना 'आप' युवक आघाडीने व्यक्त केली.

महापालिकेच्या कामांमध्ये भ्रष्टाचार, दलाल किंवा टक्केवारीचा त्रास होत असल्यास नागरिकांनी गप्प न बसता आवाज उठवावा, असे आवाहन युवक आघाडीने केले आहे.

ऋषिकेश कानवटे म्हणाले, "फक्त बोर्ड बदलून विकास होत नाही. बोर्डावर नाव 'रायगड' असेल आणि आत भ्रष्टाचार सुरू असेल, तर हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. सत्ताधाऱ्यांनी शिवरायांच्या नावाचा वापर मतांसाठी करण्याऐवजी त्या नावाचा सन्मान राखत प्रशासनातील भ्रष्टाचार मुळापासून संपवावा."

"नागरिक गप्प बसले तर भ्रष्ट व्यवस्था कधीच बदलणार नाही. त्यामुळे आता दिखाव्याच्या राजकारणाविरोधात आवाज उठवण्याची वेळ आली आहे," असा इशाराही युवक आघाडीने दिला.

## आकुर्डीतील कुटे मेमोरियल रुग्णालयात सुविधांचा अभाव; रुग्ण त्रस्त

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापलिकेच्या आकुर्डी येथील कै. प्रभाकर मल्हारराव कुटे मेमोरियल रुग्णालय उभारणीसाठी 39 कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. 5 मजली हे रुग्णालय 100 बेडचे आहे. राज्यातील सर्वाधिक प्रसूती करणारे रुग्णालय म्हणून पुरस्कारदेखील मिळाला आहे. रुग्णालयात दररोज 900 ते 1 हजार रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र, रुग्णांच्या तुलनेत याठिकाणी असणाऱ्या सुविधा अपुऱ्या आहेत. त्यामुळे रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. 2022 साली रुग्णालय सुरू करण्यात आले. रुग्णालयात 60 बेड महिलांसाठी, तर 40 पुरुषांसाठी आहेत. तसेच, 12 आयसीयू आणि 10 एनआयसीयू आहेत. शस्त्रक्रिया विभाग आणि 2 सोनोग्राफी मशीन आहेत. रुग्णालयात 300 कर्मचारी असून, 65 कायमस्वरूपी कर्मचारी आहेत. रुग्णालयात मेडिसीन वॉर्ड, बालरोग विभाग, प्रयोगशाळा विभाग, अतिदक्षता विभाग, प्रसूती विभाग, नवजात अतिदक्षता विभाग, शस्त्रक्रिया विभाग, त्वचारोग विभाग, मानसोपचार तज्ज्ञ विभाग, दंतशल्य विभाग, लॅब, एक्सरे विभाग, सोनोग्राफी विभाग, फिजिओथेरपी विभाग आदी विभाग आहेत. रुग्णालयात 900 ते 1000 रुग्ण दररोज उपचारासाठी येतात.

रुग्णालयात कॅन्टिनची सुविधा नसल्यामुळे रुग्ण आणि त्यांच्यासोबत असलेल्या नातेवाइकांची गैरसोय होते. रुग्णालयात प्रसूती झालेल्या महिला आणि दाखल केलेले इतर रुग्ण, शस्त्रक्रिया झालेले रुग्ण असतात. त्यांच्यासोबत एखादी व्यक्ती व लहान मुलेदेखील आलेले असतात. जेवण किंवा नाष्टा करण्यासाठी त्यांना बाहेर जावे लागते. रुग्णालयाच्या आसपास हॉटेलदेखील नाहीत. त्यामुळे त्यांना जेवण, नाष्टा करण्यासाठी लांब जावे लागते. महिला विभागातील काही स्वच्छतागृहे बंद अवस्थेत आहेत.

## पिंपरी-चिंचवडमध्ये इंधन बचतीकडे दुर्लक्ष; शासकीय वाहनं पार्किंगमध्ये सुरूच

**पिंपरी (दै. संध्या)**



इंधन बचत करा, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले असताना शहरातील विविध क्षेत्रीय कार्यालये, तहसील कार्यालय परिसर, पालिका कार्यालये आणि शासकीय दवाखान्यांबाहेर मात्र याच्या नेमके उलट चित्र पाहायला मिळत आहे. अधिकारी कार्यालयात गेल्यानंतर त्यांचे वाहने पार्किंगमध्ये तासनतास सुरूच ठेवून चालक एसी, म्युझिक आणि मोबाईलवरील रिल्सचा आनंद घेत बसलेले दिसून आले.

विशेष म्हणजे काही वाहने इलेक्ट्रिक तर काही पेट्रोल-डिझेलवर चालणारी आहेत. मात्र, इलेक्ट्रिक गाडी असल्याने काही फरक पडत नाही, असा काही चालकांचा सूर होता; परंतु शहरात इलेक्ट्रिक वाहनांना आग लागण्याच्या घटना घडत असताना वाहने दीर्घकाळ सुरू ठेवणे कितपत सुरक्षित आणि योग्य, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

याबाबत चालकांकडे विचारणा केली असता काहींनी साहेब बाहेर येतात तेव्हा त्यांना गाडी थंड हवी असते, असे सांगितले. तर, काहींनी गाडी इलेक्ट्रिक आहे, त्यामुळे इंधन जळत नाही, असे कारण पुढे केले. मात्र, प्रश्न फक्त इंधनाचा नाही; विजेच्या अपव्ययाचाही आहे. एका बाजूला सामान्य नागरिक बस, मेट्रो आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून खर्च आणि इंधन बचतीचा प्रयत्न करत आहेत. तर, दुसऱ्या बाजूला प्रशासनातील अधिकारी आणि सत्ताधारी यंत्रणा स्वतःच नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे.

## साठ कोटींच्या घोटाळ्यात प्रशासन-सत्ताधाऱ्यांची 'सेटिंग'?

**पिंपरी (दै. संध्या)**



महापालिकेतील ६० कोटी १८ लाखांच्या कथित आर्थिक घोटाळ्याने वेगळे वळण घेतले आहे. बोगस उपसूचनांच्या आधारे ठेकेदारांना परस्पर बिले दिल्याचे चौकशीत समोर आल्यानंतर अद्याप कोणावरही ठोस फौजदारी कारवाई झालेली नाही. उलट या प्रकरणातील केंद्रस्थानी असलेले मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनीच महापालिकेच्या कारवाईला 'मॅट'मध्ये आव्हान देत सक्तीच्या रजेचा आदेश रद्द करून घेतल्याने प्रशासनाची भूमिका आणखी संशयास्पद ठरली आहे.

महापालिकेच्या शुक्रवारी (दि. १५) झालेल्या सर्वसाधारण सभेत हा मुद्दा पुन्हा एकदा गाजला. चौकशी अहवाल सभागृहात मांडण्याची मागणी नगरसेवकांनी लावून धरली. मात्र, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हा अहवाल सभागृहात सादर करण्यास स्पष्ट नकार दिला. हा प्रशासकीय अहवाल असून तो शासनाकडे पाठविण्यात आला आहे. पुढील निर्णय सरकार घेईल, असे सांगत आयुक्तांनी राज्य शासनाच्या कोर्टात चेंडू ढकलला. त्यातच चौकशी समितीने १४ बोगस उपसूचनांद्वारे ६० कोटी १८ लाखांचे व्यवहार झाल्याचे स्पष्ट नमूद केले असतानाही संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदारांविरोधात अद्याप गुन्हे दाखल झालेले नाहीत. विरोधकांनी सातत्याने फौजदारी कारवाईची मागणी केली असली, तरी प्रशासनाने केवळ अहवाल शासनाकडे पाठवला, यापलीकडे कोणतीही भूमिका घेतलेली दिसत नाही.

## मी देशाचे पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणासाठी काम करेन : कांबळे

**पिंपरी (दै. संध्या)**

कबीर राहुल कांबळे यांनी देशातील सर्वोच्च परीक्षा, केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), उत्तीर्ण करून पिंपरी चिंचवड शहराला गौरव मिळवून दिला आहे. त्यांनी 125 वा क्रमांक मिळवून आयएफएस (वनसेवा) साठी निवड झाली आहे. पिंपरी चिंचवडच्या पत्रकारांनी काल महानगरपालिका इमारतीच्या पत्रकार कक्षात श्री. कांबळे यांचे भव्य स्वागत केले. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाची एक पुस्तक, एक शाल आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी उपस्थित असलेल्या त्यांच्या आई-वडिलांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला उपस्थित ज्येष्ठ पत्रकार नाना कांबळे, बाळासाहेब ढसाळ, संतलाल यादव, बाबू कांबळे, अविनाश कांबीकर, दादाराव आढाव, दिलीप देहाडे आणि इतर अनेक आदरणीय पत्रकार या कार्यक्रमाला उपस्थित होते. ज्येष्ठ समाजसेवक मारुती भापकर आणि युवराज दखले हे ही उपस्थित होते आणि त्यांनी कांबळे यांना यश व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कठोर परिश्रम, दृढनिश्चय आणि अविरत अभ्यासातून मिळवलेल्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहराचा अभिमान वाढला असून, कबीर राहुल कांबळे शहरातील तरुणांसाठी प्रेरणास्थान बनला आहे.

ज्येष्ठ पत्रकार संतलाल यादव यांनी आपले विचार व्यक्त केले आणि कबीर कांबळे व त्यांच्या पालकांचे या यशाबद्दल अभिनंदन केले. त्यांनी शहरातील तरुणांना प्रेरणा देण्यासाठी परीक्षेची तयारी, कोचिंग आणि अभ्यासासाठी वापरलेल्या पुस्तकांविषयी सविस्तर माहिती देण्याचे विनंती केले.



मारुती भापकर, नाना कांबळे, युवराज दाखले आणि बाळासाहेब ढसाळ यांनी गरीब, शोषित आणि वंचितांचा आवाज बनून, न्यायासाठी काम करून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वप्ने साकार करण्यासाठी सूचना दिल्या. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, माजी पालिका अधिकारी शांताराम भोंडवे यांचे सुपुत्र संकेत भोंडवे (आयएएस) आणि काळेवाडी चे माजी नगरसेवक सुरेश नाढे पाटील यांचे सुपुत्र विक्रम सुरेश नाढे (आयएफएस) यांनी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून शहराला गौरव मिळवून दिला आहे.

मी देशाचे पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधने जपण्यासाठी काम करेन असे कबीर कांबळे आपले विचार व्यक्त करताना आणि पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना, कबीर कांबळे म्हणाले की, ते दहावीत असताना, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांच्या कार्यशैलीतून त्यांना यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्याची प्रेरणा मिळाली होती. तो पहिल्या प्रयत्नात अयशस्वी झाला, पण दुसर्‍या प्रयत्नात यशस्वी झाला आणि 125 वा क्रमांक मिळवला. त्याने घरी शिकवणी शिवाय दिवसाला 11 तास अभ्यास केला. त्याने प्रा. लक्ष्मीकांत यांच्यासह काही नामांकित लेखकांची पुस्तके वाचली. तो 'द हिंदू' वृत्तपत्र ऑनलाइन, विशेषतः संपादकीय लेखही वाचत होता. आपल्या मुलाखतीची आठवण सांगताना तो म्हणाला की, माझ्या शूटचे खूप कौतुक झाले आणि त्यानंतर सर्वसाधारण प्रश्नोत्तरांची फेरी झाली. एक प्रश्न वन विभागाशी संबंधित होता की, जर जंगलात आग लागली तर ती विझवण्यासाठी पहिले पाऊल काय उचलले जाईल? देशात विकासाची कामे वेगाने सुरू आहेत आणि या कामांच्या आड येणारी झाडेही तोडली जात आहेत, परंतु त्यांच्या जागी नवीन झाडे लावण्याची गरज आहे. जर असे झाले नाही, तर मी संविधानाने मला दिलेल्या अधिकारांचा वापर करेन. देशाचे पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनासाठी महान कार्य करण्याची माझी तीव्र इच्छा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जेजुरीच्या जानाई देवीला चंदन उटीचां साज, मोगरा महोत्सव

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता व जागृत श्रद्धास्थान जानाई देवीला चंदन उटीचां साज करण्यात आला, तसेच जानाई देवी मंदिरात मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला. जेजुरी येथील ग्रामदेवता जानाई देवी मंदिरात अधिक मास प्रारंभ निमित्त सकाळी देवीला पूजा अभिषेक घालण्यात आला, त्यानंतर चंदन उटी चां साज करून मोगऱ्याच्या फुलांची सजावट करण्यात आली. यानिमित्त भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. नित्य सेवेकरी, व जानाई भक्तांच्या वतीने हा मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला.

### पत्नीच्या खून प्रकरणी पोलिसांकडून पती नवनाथ पारखेला अटक

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील निमगाव तर्फे महांळुंगे येथील विवाहिता रुपाली नवनाथ पारखे हिचा तिच्या पतीने खून केल्याची घटना घडली, पोलिसांनी आरोपी नवनाथ बाजीराव पारखे याला अटक केली. याबाबतची हकिकत अशी की, शनिवारी दुपारी शेतातील गोठ्यात नेवून रुपाली हिचा दोन्ही हाताने गळा दाबून आरोपीने तिचा खून केला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिच्या गळ्याला दावे बांधून (दोरखंड) गोठ्यातील लोखंडी पाईपाला लटकावून तिने गळफास घेतला असे भासविले. याबाबत रुपाली हिचा भाऊ विकास वसंत पवार ( रा. बल्लाळवाडी) यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. याबाबत अधिक तपास सपोनि गटकूळ करत आहेत. घटनास्थळी उपविभागिय पोलिस अधिकारी धनंजय पाटिल व पोलिस निरिक्षक किरण अवचर यांनी भेट दिली.



### यंग ज्वाली क्लबचे सल्लागार जगदीश वाव्हळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त सन्मान

चाकण (दैनिक संध्या) : आधी केले मग सांगितले, हे ब्रीद सत्यात उतरवणारे भारतीय कामगार सेनेचे नेते, येथील यंग ज्वाली क्लबचे सल्लागार जगदीश वाव्हळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त सन्मान करण्यात आला. चाकण उद्योग पंढरीतील एनटीबी या बहुराष्ट्रीय कंपनीत तब्बल ३८ वर्ष अविरतपणे सेवा केल्याबद्दल वाव्हळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त कंपनी प्रशासनाच्या वतीने कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक कमल कचोलिया व व्यवस्थापकीय संचालिका मंजुषा कचोलिया व सरव्यवस्थापक पी. राजा यांच्या मार्गदर्शनाखाली शाल, श्रीफळ, मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कंपनीचे मनुष्यबळ अधिकारी एस.एम.चडचणे, सहाय्यक रवींद्र कामत, रवींद्र कांबळे, उत्पादन अधिकारी एन.आर. वलवे, पी.सी.गुरव, ए.डी. रासकर, व्ही.एच.पाटील, जे.बी.शेख, संतोष धोत्रे, दीपक वामन, विक्रम भेगडे, अनिल ताडे आदी उपस्थित होते. सिद्धाराम चडचणे यावेळी म्हणाले," जो दुसऱ्यांचं भलं इच्छितो त्यांचं देवही भलं करतो, हे जगदीश वाव्हळ यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. जगदीश यांनी आपल्या ३८ वर्षांच्या सेवेत संयम आणि माणुसकी जपली. कोणाच्या विश्वासाला तडा जाऊ न देता त्यांनी कामाला प्राधान्य दिले. त्यांचा इतरांनी आदर्श घेतला पाहिजे." जगदीश वाव्हळ यावेळी म्हणाले," निवृत्ती म्हणजे शेवट नाही, तर आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे. इतरांच्या सुखदुःखात सहभागी होणे गरजेचे असून, त्यातच समाधान मिळते. सहकार्याची भावना टिकवण्याची गरज निर्माण झाली आहे." रवींद्र कामत यांनी सर्वांचे आभार मानले.

# चाकण बाजारात डांगर भोपळा, हिरवी मिरची व वाटाण्याची प्रचंड आवक



चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये डांगर भोपळा, हिरवी मिरची, कांदा, बटाटा व वाटाण्याची प्रचंड आवक झाली. फळभाज्या व पालेभाज्यांची आवक आणि भावातही घसरण झाली. एकूण उलाढाल ८ कोटी ३० लाख रुपये झाली.


चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ३ हजार २५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ५०० ते १,२०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक २,००० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,४०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक २५ क्विंटल झाली. लसणाला १२ हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३१० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार ५०० रुपयांपासून ५ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे -कांदा - एकूण आवक - ३,२५० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,२०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३. ५००. बटाटा - एकूण आवक - २,००० क्विंटल.भाव क्रमांक १.१,४०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - २७४ क्विंटल (२,५०० ते ३,००० रू.), कोबी - १७० क्विंटल (८०० ते ९०० रू.), फ्लॉवर - १५५ क्विंटल (१,२०० ते १,३०० रु.), वांगी - ६८ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), भेंडी - ६८ क्विंटल (३,५०० ते ४,५०० रु.), दोडका - ४८ क्विंटल (४,००० ते ५,००० रु.), कारली - ५४ क्विंटल ( ३,५०० ते ४,५०० रु.), दुधीभोपळा - ३६ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), काकडी - ६५ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), फरशी - ११ क्विंटल (१४,००० ते १५,००० रु.), वालवड - २८ क्विंटल (६,००० ते ७,००० रुपये), ढोबळी मिरची - ९८ क्विंटल (५,००० ते ६,००० रु.), चवळी - २८ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), वाटाणा - २० क्विंटल (८,००० ते ९,००० रू.), शेवगा - ३० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), गाजर - ११५ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), गवार - ४२ क्विंटल (४,५०० ते ५,५०० रु.), आले - १५० क्विंटल (४,५०० ते ५,५०० रु.),.

# अधिक मास पूर्वसंध्येला जातेगाव येथे भव्य देवपूजा व संतसमागम संपन्न

कोरेगावमुळ (दै. संध्या)



अधिक मासाच्या पूर्वसंध्येला श्री दत्तात्रेय प्रभु देवस्थान जातेगाव येथे परमपूज्य मंहत दिवाकर बाबा अकुळनेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महानुभाव पंथातील उपाध्य कुलाचार्य व वर्धनस्थ पिढीचे कुलवंदन कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात पार पडला. या पवित्र सोहळ्यासाठी पुणे जिल्ह्यासह विविध भागांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हजारो भक्तांना संतवंदन व देवपूजेचा लाभ प्राप्त झाला. या प्रसंगी महानुभाव पंथाचे उपाध्यकुलाचार्य आचार्यप्रवर वर्धनस्थ बिडकर बाबा रणाईचे, महंत पातुरकर बाबा, गवळणकर बाबा, पुणे जिल्हा महानुभाव परिषद अध्यक्ष रामचंद्रबाबा गुर्जर, मयंकराज बाबा, दत्तराज सिन्नरकर, बायराज जामोदेकर, दत्तराज विद्वांस, अनिल मराठे, रवींद्रमुनी पंजाबी, अविनाश पंजाबी, सुबोधमुनी धाराशिवकर तसेच अनेक संत-मंहत व सदस्य मंडळी हजारोंच्या संख्येने उपस्थित होती.

कार्यक्रमादरम्यान देवपूजा, वंदन, महाआरती, संतपूजन तसेच महाप्रसादाचा भव्य सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. संपूर्ण परिसर भजनाच्या वाद्याने तथा गायनाने 'जय श्रीकृष्ण तथा दत्त नामाच्या जय घोश्याने' नामस्मरणाने दुमदुमून गेला होता. या कार्यक्रमामुळे भाविकांमध्ये आध्यात्मिक उत्साह निर्माण झाला असून, महानुभाव पंथाची परंपरा व संतसंस्कृती अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पुणे एसटी ताफ्यात 10 नव्या ‘जिजाऊ’ बस; बारामती-नीरा प्रवासाला वेग

## स्वारगेट-बारामती मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा

बारामती (दै. संध्या)

> पुणे विभागाच्या ताफ्यात दाखल झालेल्या या 10 नव्या ‘जिजाऊ’ बसमुळे बारामती आणि स्वारगेट मार्गावरील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. शटल सेवेमुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि सीसीटीव्हीमुळे प्रवास अधिक सुरक्षित होईल. प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहोत.
> -कमलेश धनराळे, विभागीय वाहतूक अधिकारी, एसटी पुणे विभाग

एसटी महामंडळाच्या पुणे विभागाच्या ताफ्यात शनिवारी (दि. 16 मे) दुपारी 10 नव्या ‘जिजाऊ’ बस दाखल झाल्या आहेत. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेल्या घोषणेनुसार या बस पुणे मुख्यालयात आल्या असून, यामुळे बारामती आणि नीरा परिसरातील प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. पुणे मुख्यालयात आगमन होताच या बसचे तातडीने वाटप करून त्या बारामतीकडे रवाना करण्यात आल्या आहेत.

ताफ्यात दाखल झालेल्या 10 बसचे बारामती डेपो आणि बारामती एमआयडीसी डेपोमध्ये प्रत्येकी पाच याप्रमाणे समसमान वाटप करण्यात आले आहे. बारामती डेपोला 5 बस देण्यात आल्या. या बसेस ‘बारामती-निरा’ मार्गावर धावणार आहेत, तर बारामती एमआयडीसी डेपोला 5 बस देण्यात आल्या.

या बस स्वारगेट-बारामती एमआयडीसी डेपो या मार्गावर प्रवाशांच्या सेवेत तैनात असतील. दोन महिन्यांपूर्वी एक जिजाऊ नावाची बस एसटीच्या पुणे मुख्यालयात आली होती, जी सध्या स्वारगेट-बारामती मार्गावर यशस्वीपणे धावत आहे. आता आणखी 10 बसची भर पडली आहे.

या सर्व बस ‘शटल सेवा’ म्हणून चालवल्या जाणार आहेत. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता, या बस ‘3 बाय 2’ आसन व्यवस्थेच्या म्हणजेच 56 सीटर असतील. प्रवाशांच्या, विशेषतः महिलांच्या सुरक्षेचा विचार करून या सर्व बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# शिरूरमध्ये एमडी ड्रग्स कारखान्याचा कट उघड; पोलिस तपासात धक्कादायक खुलासा

शिरूर (दै. संध्या)

मागील काही दिवसांपूर्वी शिरूर तालुक्यामध्ये पोलिसांनी एमडी ड्रग्स प्रकरणात काही गुन्हेगारांना गजाआड केले. या गुन्हेगारांची कसून चौकशी करीत असताना एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. हे गुन्हेगार केवळ एमडी ड्रग्सची विक्रीच करीत नव्हते, तर चक्क या परिसरात ड्रग्सनिर्मितीचा कारखाना काढण्याचे नियोजन करीत होते. पोलिसांच्या कारवाईमुळे हा मोठा अनर्थ टळला असला, तरी यानिमित्ताने नशेच्या बाजारातील सौदागरांचे भयानक मनसुबे उघड झाले आहेत.

मागील दोन-अडीच वर्षांपासून एमडी ड्रग्स प्रकरणात अनेकांना अटक झाली. कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त झाला; तरीही ही शृंखला अविरतपणे सुरूच आहे. नशेचा हा नवा प्रकार तरुणाईत खूप खोलपर्यंत रुजला आहे. सुरुवातीच्या काळात या सौदागरांनी बाहेरून ड्रग्स आणून आपले हातपाय पसरविले. मात्र, आता त्यांना याच परिसरात थेट कारखानदारी उभी करायची आहे. बाहेरील गुन्हेगार स्थानिक पातळीवरील भक्कम पाठिंब्याशिवाय आणि मदतीशिवाय इतके मोठे धाडस करूच शकत नाहीत, हे आता स्पष्ट झाले आहे. पुणे-नगर रस्त्याच्या आसपासच्या परिसरात या रॅकेटने चांगलेच बाळसे धरले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आजवर पोलिस कारवाईत जे गुन्हेगार सापडले, त्यातील बहुतांश जणांची पोलिसदफ्तरी कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नव्हती. समाजात पत असणाऱ्या आणि चांगल्या कुटुंबातील मुलांना गळाला लावून हे रॅकेट उभे केले जात असल्याचे समोर येत आहे.



एमडी ड्रग्सचे वितरण करणारी कोणतीतरी अत्यंत ‘पॉवरफुल’ शक्ती पडद्यामागून सूत्रे हलवत आहे, जी अद्याप पोलिसांच्या रडारवर आलेली नाही. या वितरणव्यवस्थेतील गुन्हेगारांना एमडी ड्रग्स कशा पद्धतीने तयार करायचे, याचे पूर्ण तांत्रिक ज्ञान आहे आणि म्हणूनच ते या परिसरात कारखाना काढण्याचे स्वप्न पाहत आहेत. अनेकदा तपासात परराज्यांतील टोळ्यांचा सहभाग समोर येतो; मात्र स्थानिक पातळीवर आश्रय मिळाल्याशिवाय बाहेरचे गुन्हेगार येथे आपला जम बसवूच शकत नाहीत, हे वास्तव आहे. एमडी ड्रग्स नावाच्या या विषाने परिसरातील कुटुंबव्यवस्था खिळखिळी करून टाकली आहे. अनेक तरुण या व्यसनाच्या आहारी जाऊन मानसिकदृष्ट्या विकलांग झाले आहेत. पानटपऱ्या, मोटारसायकलवरून किंवा रस्त्याच्या कडेला उभे राहून छुप्या पद्धतीने या ड्रग्सची विक्री होत असल्याचे पोलिस कारवायांवरून स्पष्ट झाले आहे. दरवेळी केवळ किरकोळ विक्रेता पोलिसांच्या हाती लागतो; मात्र मुख्य पुरवठादार (सप्लायर) अद्याप कधीच कागदावर आलेला नाही.

### शोध घेणे काळाची गरज

पोलिस तपासात उघड झालेल्या कारखानदारीच्या नियोजनामुळे आता सर्वसामान्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पोलिसांवर मात करीत स्वतःला सुरक्षित ठेवणारा हा मुख्य सूत्रधार नक्की कोण? या गुन्हेगारांना इतके मोठे धाडस करण्याचे बळ कोणाकडून मिळते? आणि या परिसरातील कायदा व सुव्यवस्थेला आव्हान देणारा ‘झारीतील शुक्राचार्य’ कोण आहे? याचा मुळासकट शोध घेणे आता काळाची गरज बनली आहे.

# ‘भंडारा’ वापराबाबत शासनाच्या सकारात्मक ऐतिहासिक सुरक्षिततेच्या नियमाचे जेजुरीकरांकडून स्वागत

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत व बहुजन समाजाचा लोकदेव असणाऱ्या जेजुरीचा खंडोबा देवाचे लेण असणाऱ्या हळद भंडारा संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने घेतलेल्या सुरक्षिततेच्या सकारात्मक निर्णयाचे जेजुरी कर नागरिकांनी स्वागत केले आहे. भेसळ व केमिकल युक्त भंडारा विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी ही केली आहे.

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाचे हळद भंडारा हे पवित्र लेण असून अनेक पिढ्यांपासून लोकदैवत खंडोबा देवाला भंडाराचे लेण अर्पण केले जात आहे. जेजुरीत वर्षाकाठी 10 यात्रा भरतात.वर्षभरात 50 लाखाहून अधिक भाविक येथे देवदर्शन व कुलधर्म कुलाचार नुसार धार्मिक विधी करत असतात. या धार्मिक विधीत भंडारा उधळून देवाचा जयघोष केला जातो. यात्रेच्या काळात लाखो भाविक जेजुरी गडावर भंडाराची उधळण करतात.या भंडाराची उधळण केल्यानंतर संपूर्ण गड परिसर भंडारा ने न्हावून जातो.या सुवर्ण कांती मुळेच देवा तुझी सोन्याची जेजुरी हे नाव प्रचलित झाले आहे.

देवाचे लेण असणाऱ्या या भंडाराला अनेक वर्षांपासून भेसळीचे ग्रहण लागले आहे. भेसळ व केमिकल युक्त भंडारा ची विक्री होत असल्याने हाच भंडारा देवाला अर्पण केला जातो. जेजुरीकर खंडोबा भक्त,लाखो भाविक हे भंडारा चे लेण श्रध्देने कपाळाला लावीत असतो.बनावट भंडारा मुळे कपाळावर आग होवून काळे चट्टे पडणे,डोळ्यांची व त्वचेची आग होणे , हळद भंडारा ग्रहण केल्यामुळे जळजळ होणे असे प्रकार घडत होते.अशा बनावट भंडारा विक्रीवर कारवाई व्हावी ही अनेक वर्षापासूनची मागणी होती. पाच महिन्यांपूर्वी जेजुरी नगरपरिषदेचे सार्वत्रिक निवडणूक झाली.निकाल दिवशी विजयी उमेदवार गडाच्या पायथ्याशी देवाचे दर्शन घेण्यासाठी गेले असता भंडाऱ्याचा भडका उडून वीस हून अधिक स्थानिक नागरिक भाजले गेले होते.या प्रकारामुळे नागरिक व भाविकांच्या संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.

श्री मार्तंड देवसंस्थान,श्री खंडोबा पालखी सोहळा समस्त ग्रामस्थ मंडळ,नगरपरिषद व विविध संघटनांनी शासनाच्या अन्न व औषध विभागाकडे याबाबत निवेदने देवून भेसळ युक्त भंडारा विक्रीवर कडक कारवाईची मागणी केली होती. याबाबत शासनानचे अन्न व औषध प्रशासन लवकरच जेजुरीतील भंडाऱ्यासाठी विशेष धोरण निश्चित करणार आहे, जे पारदर्शकता आणि शुद्धतेला प्राधान्य देईल. भाविकांच्या आरोग्यासाठी या संदर्भात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी निर्देश दिले.

जेजुरी गडकोटावर भंडारा उधळून आग लागल्याची घटना काही काळापूर्वी घडली होती. लोकप्रतिनिधींनी या घटनेबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर भंडाऱ्याच्या सुरक्षिततेसाठी आणि पारदर्शकतेसाठी विशेष धोरण ठरविण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती . या बैठकीत विविध देवस्थानांच्या ठिकाणी विकला जाणारा ‘हळद भंडारा’ शुद्ध हळदीच्या स्वरूपातच उपलब्ध असावा, तसेच विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार अन्न परवाना घेऊनच विक्री करावी, असे स्पष्ट निर्देश स्थानिक प्रशासनाला दिले आहेत. यामुळे भेसळयुक्त ‘हळद भंडारा’ विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे शक्य होणार आहे. मंत्री नरहरी झिरवाळ यांनी प्रशासकीय यंत्रणेला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून, त्याच्या मार्गदर्शनाखाली जेजुरी नगरपरिषद आणि आरोग्य विभाग कार्यवाही करणार आहे.



शासनाने जेजुरीच्या भंडारा संदर्भात घेतलेल्या या ऐतिहासिक निर्णयाचे जेजुरी नगरपरिषद, श्री मार्तंड देवसंस्थान, श्री खंडोबा पालखी सोहळा समस्त ग्रामस्थ मंडळ,पुजारी सेवक वर्ग, नित्य सेवेकरी व ग्रामस्थांनी स्वागत केले आहे. याबाबत बोलताना जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी शासनाच्या सकारात्मक निर्णयाचे स्वागत केले.भंडारा हा देवाचे पवित्र लेणं असून यातील भेसळी मुळे स्थानिक नागरिक,भाविक,पुजारी वर्ग यांना दुष्परिणाम भोगावे लागले आहेत. मध्यंतरी भंडाऱ्याचा भडका उडून नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी बरोबरच अनेकजण भाजले गेले,ही दुर्देवी घटना आहे.

या पुढील काळात अशा घटना घडू नयेत यासाठी शासनाच्या निर्णयाची जेजुरी नगरपरिषदेकडून अंमलबजावणी केली जाईल .याबाबत जनजागृती करण्यासाठी फलक लावले जातील व बनावट भंडारा विक्री करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री मार्तंड देवसंस्थान चे विश्वास मंगेश घोणे यांनी शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करून आभार मानले. भेसळ युक्त व केमिकल युक्त भंडारा विरोधात सातत्याने कायम स्वरुपी ही मोहीम राबविणे आवश्यक आहे. तसेच देवाचे लेण असणाऱ्या भंडाऱ्याचे पावित्र्य राखणे आवश्यक आहे.यासाठी शासन जे आदेश देतील त्याची अंमबजावणी करण्यासाठी देवसंस्थान कटिबध्द आहे असे त्यांनी सांगितले.

श्री खंडोबा पालखी सोहळा, खांदेकरी मानकरी ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांनी, मंडळाने शासनाकडे भेसळ युक्त भंडारा विक्रीवर कारवाई व्हावी ही सातत्याने मागणी केली होती. शासनाने या मागणीला न्याय दिला आहे,स्थानिक नागरिक,पालखी सोहळ्यातील खांदेकरी,मानकरी, नित्य सेवेकरी,लाखो भाविक यांच्या आरोग्याच्या हितासाठी शासनाबरोबर आम्ही सहकार्य करू,भंडारा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी भाविकांचे आरोग्याचे हित व देवाचे लेण असणाऱ्या भंडाराचे पवित्र लक्षात घेवून शुद्ध भंडारा विक्रीसाठी ठेवावा असे आवाहन केले आहे.तसेच बनावट भंडाऱ्याची विक्री होवू नये यासाठी शासनाने तपासणी अधिकारी कायमस्वरूपी नियुक्त करावा.

देवाचे पुजारी असणाऱ्या सेवक वर्गाचे प्रतिनिधी गणेश आगलावे यांनी वर्षभर पुजारी सेवक वर्ग,नित्य सेवेकरी भाविक स्थानिक नागरिक देवाची सेवा करीत असतात.या सर्वांचा देवाचं लेण असणाऱ्या भंडाऱ्याबाबत अत्यंत श्रध्देने नाते आहे. या पवित्र नात्या बाबत, धार्मिक भावना बाबत आदर राखणे आवश्यक आहे.शासनाच्या या सकारात्मक निर्णयाचे पुजारी वर्गाचे वतीने स्वागत करीत असून शासनाने त्वरित कारवाई करावी असे सांगितले. एकंदरीत शासनाने बनावट, भेसळयुक्त भंडाऱ्याबाबत त्वरित कार्यवाही करावी असा नागरिकांचा सुर पाहण्यास मिळत आहे.

# सोमनाथ ‘स्वाभिमान पर्व’

## श्रद्धेच्या विजयाची आणि भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाची १००० वर्षे



**भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर, जिथे अथांग अरबी समुद्र भगवान शिवाच्या चरणांचे प्रक्षालन करतो, तिथे उभे असलेले प्रभास पाटनचे सोमनाथ मंदिर केवळ एक वास्तू नाही, तर ते भारताच्या अजेय आत्मसन्मानाचे जिवंत प्रतीक आहे. शिवपुराणात उल्लेखिलेल्या द्वादश ज्योतिर्लिंगांमधील प्रथम स्थान म्हणून सोमनाथाचे महत्व अनन्यसाधारण आहे. परंतु, आज जेव्हा आपण २०२६ या वर्षात पदार्पण केले आहे, तेव्हा हे मंदिर एका ऐतिहासिक कालखंडाचे साक्षीदार म्हणून आपल्यासमोर उभे आहे.**

हे वर्ष भारताच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे. या वर्षाचे महत्व दोन प्रमुख कारणांसाठी आहे. जानेवारी १०२६ मध्ये आक्रमक महमूद गजनीने सोमनाथ मंदिरावर पहिले भीषण आक्रमण केले होते. या घटनेला या वर्षात १००० वर्षे पूर्ण होत आहेत. हे पर्व त्या सर्व वीर आत्मबलिदानांचे स्मरण करण्याचे निमित्त आहे, ज्यांनी या मंदिराच्या रक्षणासाठी आणि अस्मितेसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. तसेच मे १९५१ मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते नूतन सोमनाथ मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली होती. या ऐतिहासिक घटनेला २०२६ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजेच, हे वर्ष सोमनाथ मंदिराच्या ‘अमृत महोत्सवा’चेही आहे.

शतकानुशतके परकीय आक्रमकांनी या मंदिराला लुटले, त्याची मोडतोड केली. त्यांचा उद्देश केवळ संपत्ती लुटणे हा नव्हता, तर भारताचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कणा मोडणे हा होता. परंतु, प्रत्येक आक्रमणाने भक्तांची श्रद्धा अधिकच दृढ झाली. जितक्या वेळा हे मंदिर पाडले गेले, तितक्याच जोमाने भारतीयांनी पुन्हा त्याची उभारणी केली.

स्वातंत्र्यानंतर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथच्या पुनर्बांधणीचा जो संकल्प सोडला, तो केवळ एका मंदिराचा जीर्णोद्धार नव्हता, तर तो गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होणाऱ्या भारताचा उद्घोष होता. सरदार पटेलांचा हाच वारसा पुढे नेण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.

सोमनाथ हे केवळ शिवाचे धाम नाही, तर ते भगवान श्रीकृष्ण आणि शक्तीच्या उपासनेचेही पावन स्थान आहे. हे मंदिर प्राचीन काळापासून भारताचे आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र राहिले आहे. येथील ‘स्वाभिमान पर्वा’चा उद्देश आपल्या गौरवशाली वारशाची ओळख नव्या पिढीला करून देणे हा आहे. ‘स्वाभिमान पर्व’ हे केवळ उत्सवाचे साधन नसून, ते आपल्या सामूहिक संकल्पाचे प्रतीक आहे.

सोमनाथ मंदिराची कथा ही विजयाची कथा आहे. अन्यायावर न्यायाच्या, विनाशावर सृजनाच्या आणि अंधारावर प्रकाशाच्या विजयाची. १०२६ मधील त्या काळरात्रीपासून सुरू झालेला हा प्रवास आज २०२६ मध्ये एका वैभवशाली भारताच्या उदयापर्यंत येऊन पोहोचला आहे. सोमनाथचा हा जिर्णोद्धार जगाला सांगतो की, भारत आता केवळ स्वतंत्र झालेला देश नाही, तर तो आपली प्राचीन ओळख आणि वैभव पुन्हा प्राप्त करणारा ‘विश्वगुरु’ बनण्याच्या मार्गावर असलेले राष्ट्र आहे.

या ‘स्वाभिमान पर्वा’च्या निमित्ताने आपण सर्वजण या पवित्र भूमीला नमन करूया आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी व संस्कृतीच्या रक्षणासाठी कटिबद्ध होऊया.

**अॅड. आकाश फुंडकर,**
**कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य.**

# सोने-चांदी आणखी महागणार!


## केंद्र सरकारने आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांवर नेले



देशातून परदेशात जाणारा पैसा कमी करण्यासाठी आणि रुपयाची घसरण रोखण्यासाठी केंद्र सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ केलीय. सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क 6 टक्क्यांवरून थेट 15 टक्क्यांपर्यंत वाढवलं असून, हा निर्णय मंगळवार मध्यरात्रीपासून लागू करण्यात आलाय. नव्या रचनेनुसार सरकारने 10 टक्के बेसिक कस्टम ड्युटी आणि 5 टक्के AIDC (ॲग्रीकलचर इन्फ्रास्ट्रक्टर अँड डेव्हलपमेंट सेस) लागू केला आहे. त्यामुळे परदेशातून सोने-चांदी आणणे आता अधिक महाग होणार आहे, याचा थेट परिणाम देशातील सराफा बाजारावर होण्याची शक्यता आहे. सोने खरेदीसाठी ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागतील.

गुंतवणुकीसाठी घेतले जाणारे गोल्ड बारही महाग होण्याची शक्यता : महाराष्ट्र सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष निर्भयसिंह राजपूत सांगतात की, भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सोने वापरणारा देश आहे. देशातील मोठी मागणी परदेशातून येणाऱ्या सोन्यावर अवलंबून असल्याने शुल्कवाढीचा परिणाम तात्काळ दिसू शकतो. दागिने, सोन्याची नाणी आणि गुंतवणुकीसाठी घेतले जाणारे गोल्ड बारही महाग होण्याची शक्यता आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सोने वापरणारा देश मानला जातो. भारतात वापरले जाणारे बहुतांश सोने परदेशातून आयात केले जाते. केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाच्या वार्षिक अहवालानुसार, 2023-24 या आर्थिक वर्षात भारताने तब्बल 45.54 अब्ज डॉलरचे सोने आयात केले होते. त्याआधी 2022-23 मध्ये ही आयात 35.02 अब्ज डॉलर इतकी होती. म्हणजेच एका वर्षात सोन्याच्या आयात खर्चात सुमारे 30 टक्क्यांनी वाढ झाली होती. 2025-26 या आर्थिक वर्षात भारताची सोन्याची आयात आणखी वाढून जवळपास 72 अब्ज डॉलरपर्यंत पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. चांदीच्या आयातीतही मोठी वाढ झाली असून ती जवळपास 12 अब्ज डॉलरपर्यंत गेली आहे.

# नात्यांचे तीन मुखवटे : जगण्याची आणि जपण्याची कला



**नात्यांची वीण टिकवण्यासाठी कधी डोळस अंधत्व, कधी सहनशील बहिरेपणा आणि कधी संयमी मौन स्वीकारावं लागतं. समोरच्याच्या उणिवांकडे दुर्लक्ष, कटू शब्दांना माफ करणं आणि योग्य वेळी शांत राहणं हीच नाती जपण्याची खरी कला आहे. प्रेमासाठी केलेला हा अदृश्य अभिनयच नात्यांना दीर्घायुष्य देतो.**

नजरेवरती पडदा टाकू,
उणिवांचा हा नजारा,
चूक तुझी ही भासे मजला,
देखणा तुझा नखरा।
डोळस सोडून अंधार स्वीकारू,
प्रेमाच्या या रीतीने,
संसाराची वीण सांधू,
समजूतदार हसण्याने॥ १ ॥
तिखट बोलांची धार येता,
कानांवरती आवरणे,
भाषण तुझे गाणे वाटे,
लयीत तुजला सावरणे।
क्षमेचा हा कवच पांघरू,
गर्वाची ही सोडून ढाल,
शांततेच्या वाऱ्याने मग, नात्याची
ही राहे खुशाल॥ २ ॥
शब्दांची ही शस्त्रे आवरू,
ओठांवरती शांतता,
मौनदीप हा मनात लावू,
संपवून ही कटुता।
कसरत ही अभिनयाची,
प्रेमासाठी केलेली,
नात्यांची ही वेल सदा,
शब्दावाचून बहरलेली॥ ३ ॥

मानवी आयुष्य म्हणजे नात्यांचा एक सुंदर पण नाजूक कोलाज. ही नाती कधी रेशमी धाग्यासारखी मऊ असतात, तर कधी काचेसारखी संवेदनशील. नात्यांचं हे विणकाम टिकवून ठेवणं ही एक मोठी जीवनकला आहे. ही जीवनकला साध्य करण्यासाठी आपल्या मुद्रेवर तीन मुखवटे परीधान करावे लागतील.

हे मुखवटे म्हणजेच आंधळा, बहिरा आणि मुका होता आले पाहीजे. हा केवळ सुवीचार किंवा केवळ उपदेश नसून नातेसंबंधांच्या मंदिरातील ‘मौनदीप’ आहेत. नाती टिकवण्यासाठी एकाच व्यक्तीला अनेकदा हे तीन मुखवटे एकाच वेळी परिधान करावे लागतात. ही कला ज्याला जमली तो खरी नाती जपू आणि वाढवू शकतो.

अर्थात आपल्या नात्यात पहिला मुखवटा येतो तो म्हणजे ‘आंधळेपणा’. याचा अर्थ असा नाही की, धृतराष्ट्र सारख अंधत्व स्विकारायच तर डोळस अंधत्व असल पाहीजे. आपल्याला समोरच्याच्या चुका दिसत असतात, पण, कधी कधी डोळे असूनही काही गोष्टींकडे दुर्लक्ष करणं, म्हणजेच प्रेमाची पट्टी डोळ्यावर बांधणं गरजेचं असतं. समोरच्याच्या उणिवांकडे काणाडोळा करून त्याच्यातील चांगुलपणा शोधणं, हा आंधळेपणा अगतिकतेचा नसून तो समजूतदारपणाचा असतो.

सर्व काही पाहणारी नजर नाती वाचवू शकत नाही; कधी कधी मुद्दाम मिटलेले डोळेच घर आणि मनं टिकवतात.


दुसरा मुखवटा आहे ‘बहिरेपणा’. नात्यांच्या प्रवासात कधी कधी कटू शब्दांचे बाण सुटतात, टीकांचे वादळ येते. अशा वेळी अहंकाराला बाजूला सारून ‘क्षमेची शाल’ पांघरून बहिरे व्हावे लागते. टोचणारे शब्द जर मनाच्या गाभाऱ्यात साठवून ठेवले, तर नात्याचा ओलावा आटायला वेळ लागत नाही. ऐकूनही न ऐकल्यासारखं करणं ही सहनशीलतेची सर्वोच्च पायरी आहे. यामुळे नात्यातील संवाद जरी थांबला, तरी विसंवाद टाळता येतो.

तिसरा आणि अत्यंत कठीण मुखवटा म्हणजे ‘मुके होणं’. जेव्हा अंतर्मनात शब्दांची धार तीव्र असते, उत्तर देण्याची पूर्ण क्षमता असते, तेव्हा ओठांवर ‘मौनाचा दीप’ लावणं हेच संयमाचं लक्षण आहे. मौन म्हणजे केवळ शांत बसणे नव्हे, तर नात्यांवर चढवलेलं ते एक सुगंधी चंदन आहे. शब्दांनी झालेली जखम भरून येत नाही, पण योग्य वेळी धरलेलं मौन नात्याचं तुटणारं घर पुन्हा सांधू शकतं.

एकाच माणसाला हे तीन चेहरे सांभाळताना मोठी कसरत करावी लागते. हे मुखवटे म्हणजे ढोंगीपणा नसून तो एक ‘अदृश्य अभिनय’ आहे, जो केवळ प्रेमापोटी केला जातो.

नात्यातलं घर हे विटा-मातीपेक्षा शब्दांच्या संयमावर आणि शांततेवर उभं असतं. शेवटी, नाती शब्दांनी नाही, तर अनेकदा न बोललेल्या मौनानेच अधिक काळ टिकतात आणि बहरतात. या तीन अवस्थांतूनच नात्यांचं नाजूक विणकाम अखंड आणि अभेद्य राहते. तर मग असे मुखवटे घालून तर पहा.

**राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**



# सोमनाथ पर्व : भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, साधना आणि आध्यात्मिकतेचे प्रतीक

**भारतीय संस्कृती ही सण, उत्सव आणि धार्मिक परंपरांनी समृद्ध अशी संस्कृती आहे. भारतातील प्रत्येक सणामागे एखादी आध्यात्मिक भावना, नैतिक संदेश किंवा सामाजिक मूल्य दडलेले असते.**

१७८३ मध्ये इंदूरच्या राणी अहिल्यादेवी होळकर यांनी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. शेकडो वर्षे भग्नावस्थेत असलेले मंदिर त्यांनी स्वखर्चाने पुन्हा उभे केले. या मंदिराचा इतिहास आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान आणि राष्ट्रीय पुनर्जागरण यांचा मेळ आहे. ‘सोमनाथ स्वाभिमान पर्व’ (२०२६) मधील या पर्वामुळे सोमनाथच्या इतिहासाला नवा उजाळा मिळाला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथच्या विकासाला गती मिळाली असून, हे स्थान केवळ एक मंदिर नसून भारताच्या सामर्थ्याचे केंद्र बनले आहे. आपल्या संस्कृतीतील विविध पर्वांपैकी सोमनाथ पर्व हे भगवान शंकराच्या उपासनेशी संबंधित एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र पर्व मानले जाते. “सोम” म्हणजे चंद्र आणि “नाथ” म्हणजे स्वामी, म्हणजेच चंद्राचे स्वामी असा त्याचा अर्थ होतो.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, संयम आणि अध्यात्म यांचा संगम मानले जाते. या पर्वाद्वारे भक्त भगवान शंकराची आराधना करून जीवनातील दुःख, संकटे आणि नकारात्मकता दूर करण्याची प्रार्थना करतात. या दिवशी मंदिरांमध्ये विशेष पूजा-अर्चा, अभिषेक, भजन, कीर्तन आणि रुद्रपाठाचे आयोजन केले जाते.

सोमनाथ पर्व हे आपल्याला संयम आणि साधनेचे महत्त्व शिकवते. उपवास हा केवळ अन्नत्याग नसून मन आणि शरीर शुद्ध ठेवण्याचा मार्ग आहे. उपवासामुळे मनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता वाढते. राग, मत्सर, लोभ आणि अहंकार यांसारख्या नकारात्मक भावनांवर विजय मिळवण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत उपवासाला आध्यात्मिक साधनेचे महत्व दिले गेले आहे.

या पर्वाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजनही केले जाते. समाजातील सर्व स्तरातील लोक या धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढण्यास मदत होते. सोमनाथ पर्व हे निसर्गाशी असलेल्या भारतीय संस्कृतीच्या नात्याचीही आठवण करून देते.

शिवपूजेमध्ये वापरली जाणारी बेलपत्रे, पाणी, दूध, धतूरा आणि फुले ही निसर्गातीलच देणगी आहेत. यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्पर संबंध अधोरेखित होतो.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावपूर्ण झाले आहे. स्पर्धा, कामाचा ताण आणि मानसिक दबाव यांमुळे अनेक लोक चिंताग्रस्त झालेले दिसतात. अशा परिस्थितीत धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरा मनाला शांतता देण्याचे कार्य करतात. सोमनाथ पर्वासारखे सण माणसाला आत्मचिंतनाची संधी देतात.

सोमनाथ पर्वाचे सामाजिक महत्वही तितकेच मोठे आहे. या पर्वाच्या निमित्ताने लोक एकत्र येतात, एकमेकांना शुभेच्छा देतात आणि सामाजिक ऐक्य दृढ करतात. भारतीय संस्कृतीत ‘वसुधैव कुटुंबकम्’ ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. म्हणजेच संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे. धार्मिक सण आणि पर्व ही भावना अधिक दृढ करतात. समाजात प्रेम, सहकार्य आणि परस्पर आदर वाढवण्याचे कार्य हे पर्व करतात.

भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव हे केवळ मनोरंजनासाठी नसून संस्कारांचे माध्यम आहेत. लहान मुलांना धार्मिक कथा, परंपरा आणि संस्कृतीची ओळख अशा सणांमधूनच होते. भक्ती, प्रामाणिकपणा, संयम आणि चांगले आचरण यांचे महत्त्व यावर चर्चा होते, त्यामुळे पुढील पिढीपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचण्यास मदत होते.

सोमनाथ मंदिरालाही भारतीय इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. गुजरातमधील प्रभास पाटण येथे असलेले सोमनाथ मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पहिले ज्योतिर्लिंग मानले जाते. या मंदिराचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. अनेक आक्रमणांमध्ये हे मंदिर उद्ध्वस्त झाले, परंतु प्रत्येक वेळी ते पुन्हा उभे राहिले. यामुळे भारतीय संस्कृतीची जिद्द, श्रद्धा आणि पुनरुत्थानाची शक्ती दिसून येते. सोमनाथ मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून भारतीय अस्मिता आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे.

सोमनाथ पर्व आपल्याला जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा देते. जीवनात कितीही संकटे आली तरी धैर्य, संयम आणि श्रद्धेच्या बळावर त्यांचा सामना करता येतो, हा संदेश या पर्वातून मिळतो. भगवान शंकराचा साधेपणा, त्याग आणि करुणा हे गुण प्रत्येकाने आत्मसात करण्यासारखे आहेत.

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक लोक आधुनिकतेकडे झुकत असले तरी भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्यांचे महत्त्व अजूनही कायम आहे. आधुनिक जीवनशैलीसोबतच संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे आवश्यक आहे. कारण संस्कृती ही समाजाची ओळख असते. आपल्या परंपरा जपल्यामुळे समाजात नैतिक मूल्ये टिकून राहतात.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, आत्मशुद्धी आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. हे पर्व माणसाला सकारात्मकतेचा मार्ग दाखवते. आपल्या मनातील वाईट विचार दूर करून सत्य, प्रेम आणि शांततेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते. भारतीय संस्कृतीतील ही परंपरा आपल्या जीवनाला आध्यात्मिक समृद्धी प्रदान करणारी आहे.

अशा पवित्र पर्वांच्या माध्यमातून समाजात चांगले संस्कार निर्माण होतात, मानसिक शांतता लाभते आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. सोमनाथ पर्व हे केवळ धार्मिक उत्सव नसून मानवी जीवन अधिक सुंदर, शांत आणि समृद्ध बनवणारे प्रेरणादायी पर्व आहे.

**– माधुरी मिसाळ, राज्यमंत्री सामाजिक न्याय विभाग**

# केंद्र सरकारचा मोठा निर्णय; सप्टेंबरपर्यंत साखरेच्या निर्यातीवर बंदी

नवी दिल्ली (दै. संध्या)



केंद्र सरकारने तात्काळ प्रभावाने 30 सप्टेंबर 2026 पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत साखरेच्या निर्यातीवर बंदी घातलीय. साखरेच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता लक्षात घेता देशांतर्गत किमती नियंत्रणात ठेवण्याच्या आणि स्थानिक पातळीवर साखरेची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने सरकारने हे पाऊल उचललंय. परकीय व्यापार महासंचालनालयाने (DGFT) जारी केलेल्या अधिसूचनेत सरकारने साखरेच्या निर्यात धोरणात बदल केला आहे. ITC (HS) कोड 1701 14 90 आणि 1701 99 90 अंतर्गत येणाऱ्या साखरेची निर्यात श्रेणी 'प्रतिबंधित' (Restricted) वरून बदलून 'निषिद्ध' (Prohibited) करण्यात आलीय. या आदेशाच्या कक्षेत कच्ची साखर (Raw sugar), पांढरी साखर (White sugar) आणि शुद्ध साखर (Refined sugar) या सर्वांच्या निर्यातीचा समावेश होतो.


विशिष्ट निर्यातींना सूट : या अधिसूचनेत असे नमूद करण्यात आले आहे की, ही बंदी 30 सप्टेंबरपर्यंत किंवा या बंदीचा कालावधी पुढे वाढवला जाईपर्यंत लागू राहील. जर या बंदीचा कालावधी वाढवला गेला नाही, तर साखरेचे निर्यात धोरण पुन्हा 'प्रतिबंधित' (Restricted) श्रेणीमध्ये परत येईल. सरकारने हे स्पष्ट केले आहे की, CXL आणि TRQ कोट्यांतर्गत युरोपियन युनियन (EU) आणि अमेरिकेला (USA) केली जाणारी साखरेची निर्यात या बंदीच्या कक्षेत येणार नाही; म्हणजेच अशा निर्यातींना यातून वगळण्यात आलंय.

काही साखरेच्या खेपांना निर्यात सुरू ठेवण्याची परवानगी : याव्यतिरिक्त 'अग्रिम प्राधिकार योजने' (Advance Authorization Scheme - AAS) अंतर्गत केली जाणारी निर्यात, तसेच अन्न सुरक्षेच्या उद्देशाने 'सरकार ते सरकार' (G2G) पातळीवर पाठवल्या जाणाऱ्या साखरेच्या खेपांना निर्यात सुरू ठेवण्याची परवानगी असेल. अधिसूचनेत पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, ज्या साखरेच्या खेपांची निर्यात प्रक्रिया आधीच सुरू झाली आहे, त्यांना काही विशिष्ट अटींच्या अधीन राहून निर्यात पूर्ण करण्याची परवानगी दिली जाणार आहे.

देशांतर्गत किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी निर्णय : शिवाय जर साखरेची जहाजावर चढवण्याची (लोडिंगची) प्रक्रिया अधिसूचनेच्या तारखेपूर्वीच सुरू झाली असेल किंवा 'शिपिंग बिल' आधीच दाखल करण्यात आले असेल आणि साखरेचे जहाज (Vessel) हा आदेश लागू होण्यापूर्वीच एखाद्या भारतीय बंदरावर दाखल झाले असेल किंवा नांगर टाकून उभे असेल, तर अशा खेपांची निर्यात प्रक्रिया पुढे सुरू ठेवता येईल. ज्या प्रकरणांमध्ये साखरेच्या खेपा अधिसूचनेच्या प्रकाशनापूर्वीच सीमाशुल्क अधिकाऱ्यांच्या (Customs authorities) किंवा संबंधित रक्षकांच्या (Custodians) ताब्यात देण्यात आल्या होत्या, अशा प्रकरणांमध्येही निर्यातीला परवानगी दिली जाणार आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, या सरकारी निर्णयामागील मुख्य उद्देश देशांतर्गत साखरेच्या किमती नियंत्रणात ठेवणे हा आहे; कारण साखरेचे उत्पादन करणाऱ्या प्रमुख प्रदेशांमध्ये उसाच्या उत्पादनात घट झाल्यामुळे सलग दुसऱ्या वर्षी साखरेचे उत्पादन हे देशांतर्गत मागणीच्या (वापराच्या) तुलनेत कमी राहण्याची शक्यता आहे. 'एल निनो'च्या (El Niño) स्थितीमुळे आगामी मान्सूनमध्ये व्यत्यय येऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे; ज्यामुळे पुढील हंगामातील उत्पादनाबाबतच्या चिंतांमध्येही वाढ झाली आहे.

6 लाखांहून अधिक टन साखरेची निर्यात : दरम्यान, भारत हा जगातील सर्वात मोठ्या साखर निर्यातदारांपैकी एक असून, या बाबतीत त्याचा क्रमांक ब्राझीलच्या खालोखाल लागतो. यापूर्वी भारत सरकारने सर्व साखर कारखान्यांना 15.9 लाख (1.59 दशलक्ष) मेट्रिक टन साखरेची निर्यात करण्यास परवानगी दिली होती. व्यापाऱ्यांनी यापैकी सुमारे 8 लाख टन साखरेसाठीचे करार यापूर्वीच पूर्ण केले होते; ज्यातील 6 लाखांहून अधिक टन साखरेची निर्यात आतापर्यंत प्रत्यक्ष पार पडली आहे.

# कॅमेरा आणि AI वैशिष्ट्ये असलेले Apple AirPods लवकरच होणार लॉन्च



Apple आपल्या स्मार्ट असिस्टंट 'Siri' ला अधिक प्रगत AI क्षमतांनी सुसज्ज करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. अनेक विलंब आणि अडथळे येऊनही, AI-आधारित हार्डवेअरच्या क्षेत्रात मागं न पडण्याचा कंपनीनं ठाम निर्धार केला आहे. ब्लूमबर्गच्या एका अहवालानुसार, Apple नवीन AirPods विकसित करण्याच्या अंतिम टप्प्यात आहे. हे AirPods कंपनीचे पहिले असे "वेअरेबल" उपकरण ठरणार आहेत, जे विशेषत AI साठीच डिझाइन करण्यात आले आहेत.

कॅमेरामुळं Siri ला मिळतील "डोळे": या नवीन AirPods च्या दोन्ही बाजूंना कमी-रिझोल्यूशनचे कॅमेरे बसवलेले असतील. हे कॅमेरे वापरकर्त्याच्या सभोवतालच्या परिसरावर लक्ष ठेवतील, ज्यामुळं एक प्रकारे Siri ला "डोळे" प्राप्त होतील. यामुळं Siri ला अधिक हुशार आणि परिस्थितीचा संदर्भ समजून घेऊन (context-aware) मदत करणे शक्य होईल. उदाहरणार्थ, जर एखाद्या वापरकर्त्यानं स्वयंपाकघरातील काही साहित्याकडे (ingredients) पाहिलं आणि विचारलं, "या साहित्यापासून मी काय बनवू शकतो?", तर AI त्या वस्तूंचं विश्लेषण करेल आणि योग्य पाककृती सुचवेल.

डिझाइन : डिझाइनच्या बाबतीत बोलायचं झाल्यास, हे AirPods दिसायला 'AirPods Pro 3' सारखेच असतील अशी अपेक्षा आहे; मात्र, त्यामध्ये कॅमेरे बसवण्यासाठी त्यांच्या "स्टेम्स" (दांड्या) थोड्या लांब असतील. कंपनीनं मूळतः हे उपकरण या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत लाँच करण्याचं नियोजन केलं होतं; परंतु, Siri ची अद्ययावत आवृत्ती अंतिम करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळं हे लाँच पुढं ढकलण्यात आलं. अहवालांनुसार, 'Gemini AI मॉडेल' वर आधारित Siri ची ही नवीन आवृत्ती सप्टेंबर महिन्यात लाँच होण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अधिक मासाच्या पहिल्याच दिवशी जेजुरी गडावर भाविकांची मोठी गर्दी

जेजुरी (दैनिक संध्या) : अधिक महिन्याच्या पहिल्याच दिवशी जेजुरीच्या खंडोबा देवाच्या दर्शनासाठी व कुलधर्म कुलाचार नुसार धार्मिक विधीसाठी भाविकांनी जेजुरी गडावर मोठी गर्दी केली होती. रविवार दिनांक 17 मे पासून अधिक महिन्याला सुरुवात झाली असून रविवार आणि अधिक महिना याचे औचित्य साधून महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या दर्शनासाठी आणि कुलधर्म कुलाचार नुसार धार्मिक विधी करण्यासाठी राज्याच्या विविध भागातून भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटे पासूनच भाविकांना रांगा लावून देवाचे दर्शन घेतले, गडावर तळी भंडाऱ्याचा विधी, जागरण गोंधळ आदी विधी भाविक करत होते. उन्हाळ्यातील रखरखते उन्हाची पर्वा न करता मोठ्या संख्येने भाविक जेजुरी गडावर आले होते. गर्दी मुळे जेजुरी गड परिसर तसेच जेजुरी शहरातील मुख्य बाजारपेठ भाविकांनी फुलून गेले होते.




### पंडीत शशांक कट्टी "कला सारथी" या पुरस्काराने सन्मानित

पुणे (दैनिक संध्या) : सुर संजीवन म्युझिक थेरपीचे संस्थापक, प्रसिद्ध सतारवादक व संगीतकार डॉ पंडीत शशांक कट्टी यांना "कला सारथी" हा पुरस्कार आर्ट ऑफ लिविंगचे गुरुदेव श्री श्री रवी शंकर,यांच्या हस्ते द आर्ट ऑफ लिविंग इंटरनॅशनल सेंटर,बेंगलुरू येथे नुकताच देण्यात आला. भारतीय कला सादरीकरण, ललित कलांचे जतन, संगोपन, संवर्धन, टिकवून ठेवणे आणि प्रोत्साहन देण्यासाठी प्रेरक शक्ती ठरल्याबद्दल हा पुरस्कार दिला जातो. शशांक कट्टी यांच्या सतारीच्या सुरांतून भारतीय शास्त्रीय संगीताची आध्यात्मिक आणि उपचारात्मक परंपरा आणि ध्यानात्मक पैलू प्रभावीपणे दिसून येतात.पारंपरिक रागसंगीताच्या माध्यमातून ध्वनीलहरी मानवाच्या मन आणि आत्म्यावर सकारात्मक परिणाम करू शकतात हे त्यांनी प्रभावीपणे सिद्ध केले आहे. या साठी त्यांना कला सारथी पुरस्कार त्यांना देण्यात आला. या वेळी शशांक कट्टी म्हणाले " या पुरस्कारने मी आनंदित झालो आहे. गेल्या ३० वर्षातील प्राचीन आयुर्वेद ,भारतीय पारंपारीक शास्त्रीय संगीत, मूड एलेव्हेशन थेअरी आणि आधुनिक साऊंड थेरपी यांच्या तत्वावर आधारित संशोधन करून "सुर संजीवन संगीतोपचार" द्वारे पाचशेहून अधिक शिष्य तयार केले. तसेच संगीतोपचार करून हजारो रुग्णांना दिलासा देण्याचे काम मी केले आहे.

### गायरान जमीन दफन भूमीसाठी देण्यास स्थगिती

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथील सरकारी गायरान जमीन गट नं. ८१८ मधील एकूण ० हे.२० आर जागा इतर समाजा करिता दफनभूमीसाठी उपलब्ध करून देण्याबाबत पारित करण्यात आलेल्या आदेशास उपविभागीय अधिकारी, खेड यांनी स्थगिती दिली आहे. चाकण परिसरातील ग्रामस्थांच्या भावना लक्षात घेऊन सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. भोसरीचे आमदार महेश लांडगे, चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, भाजप मंडल अध्यक्ष भगवान मेदनकर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख भगवान पोखरकर, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, सरपंच नरेंद्र वाळुंज, उद्योजक श्याम राक्षे, किरण कौटकर, किरण पठारे, शहाजी राक्षे, श्रीकांत जाधव, प्रसाद राक्षे तसेच इतर ग्रामस्थांनी प्रशासनाकडे या जमिनी बाबत ठोस भूमिका मांडली होती. दुसऱ्याच्या घशात जाणारी जागा वाचल्याने सत्याचा विजय झाला. खेडचे उपविभागीय अधिकारी यांनी वस्तुस्थितीचा विचार करून दिलेल्या स्थगिती आदेशामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हिंदुत्वासाठीचा लढा पुढेही असाच सुरू राहील, असे चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी सांगितले.

# कऱ्हामाई घेणार मोकळा श्वास...

## संगमेश्वर मंदिरापाशी जलपर्णी आणि गाळ काढण्याच्या भव्य मोहिमेचा शुभारंभ



**सासवड (दै. संध्या)**

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या सासवड शहराची जीवनवाहिनी असलेल्या कऱ्हा नदीला प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी सासवड नगरपालिकेच्या वतीने क-हा नदी स्वच्छता अभियानाला सुरूवात करण्यात आली आहे. कऱ्हा नदी स्वच्छतेसाठी यापूर्वी अनेक लहान-मोठ्या मोहिमा राबविण्यात आल्या होत्या, परंतु नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर साठलेली जलपर्णी आणि वर्षानुवर्षांचा गाळ यामुळे आजवर कोणत्याही मोहिमेला अपेक्षित यश आले नव्हते व ठोस काम करण्यात अनेक अडचणी येत होत्या. या गंभीर समस्येवर आता कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सासवड नगरपालिकेने ठोस पाऊल उचलले आहे. माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप व पालिकेच्या सर्व नगरसेवकांच्या थेट मार्गदर्शनाखाली हा भव्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पालिकेचे आरोग्य सभापती राजन जगताप यांच्या पुढाकारातून आज रविवारी सासवडमधील पुरातन संगमेश्वर मंदिराजवळील नदीपात्रातून जलपर्णी आणि साठलेला गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या मोहिमेसाठी आधुनिक यंत्रसामग्री आणि मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. या मोहिमेची माहिती देताना आणि नागरिकांना आवाहन करताना माजी आमदार संजय जगताप म्हणाले,"कऱ्हा नदी ही आपल्या सासवडची अस्मिता आहे. आपल्याला आपली नदी स्वच्छ, सुंदर आणि प्रवाही ठेवायची आहे. नदीची स्वच्छता राखणे हे केवळ नगरपालिका किंवा प्रशासनाचे काम नसून, ती प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. या मोहिमेचे रूपांतर एका मोठ्या लोकचळवळीत झाले पाहिजे. यासाठी सासवडमधील प्रत्येक नागरिकाने यात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे आणि प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करावे."

याप्रसंगी नगरसेविका स्मिता उमेश जगताप, प्रियांका जगताप, लिना वढणे, स्मिता सुहास जगताप, अर्चना जगताप, नगरसेवकः ज्ञानेश्वर गिरमे, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर जगताप, मयूर चौखंडे या लोकप्रतिनिधींशिवाय 'कऱ्हा नदी संवर्धन समिती'चे सर्व सन्माननीय सदस्य, सासवडमधील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनीच या मोहिमेचे स्वागत करत कऱ्हा नदीला पुनरुज्जीवित करण्यासाठी श्रमदानाचा आणि पालिकेला पूर्ण पाठिंबा देण्याचा निर्धार व्यक्त केला. या मोहिमेमुळे आगामी काळात आपली 'कऱ्हामाई' अत्यंत स्वच्छ आणि नयनरम्य रूपात पाहायला मिळेल, असा विश्वास सासवडकरांमधून व्यक्त होत आहे.

# मंदिरात दानाच्या नावाखाली हातचलाखी; महिलेचे पाच लाखांचे मंगळसूत्र लंपास

**आंबेगाव (दै. संध्या)**

श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग ता.आंबेगाव येथील अर्धपीठ गणपती मंदिर परिसरात दान करण्याचा बहाणा करून दोन अज्ञात चोरट्यांनी एका महिलेची फसवणूक करत साडेतीन तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र लंपास केल्याची घटना घडली आहे. हा संपूर्ण प्रकार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून मंचर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंदिराच्या पायथ्याशी मंगेश शेटे यांचे पूजा साहित्याचे दुकान आहे.दुपारच्या सुमारास दुकानात त्यांची आई लताबाई शेटे या एकट्याच बसल्या होत्या. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोन इसमांनी प्रथम शंभर रुपयांचे सुट्टे पैसे मागितले.त्यानंतर "मंदिरात दोन हजार रुपये दान करायचे आहेत,"असे सांगून त्यांनी पैशांची नोट टेबलवर ठेवली. दुसऱ्या व्यक्तीने आपल्या हातातील अंगठी त्या पैशांवर ठेवून विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर दोघांनी लताबाई शेटे यांना बोलण्यात गुंतवत गळ्यातील मंगळसूत्रही त्या रकमेबरोबर ठेवण्यास प्रवृत्त केले.सर्व वस्तूंची पुडी बांधून ती लाल रंगाच्या पिशवीत ठेवण्यात आली.मात्र, याच दरम्यान हातचलाखी करत आरोपींनी मंगळसूत्र अलगद काढून स्वतःजवळ ठेवले."ही पिशवी मंदिरात पोहोच करा,"असे सांगून दोघेही दुचाकीवरून पसार झाले. काही वेळाने शेटे यांनी पिशवी उघडून पाहिली असता मंगळसूत्र गायब असल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ मुलगा मंगेश शेटे याला माहिती दिली.घटनेची माहिती मिळताच मंचर पोलिसांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला.सुमारे पाच लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र चोरीला गेल्याचे समोर आले आहे.पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून आरोपी सराईत चोरटे असावेत,असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.पुढील तपास मंचर पोलीस करत आहेत.



## कनाशीत भोवाडा उत्सवाची धूम; संबळाच्या ठेक्यावर विविध सोंग्यांचा जागर

**कनाशी (दै. संध्या)**

कळवण तालुक्यातील आदिवासी भागातील कनाशी येथे वडिलोपार्जित परंपरा असलेल्या भोवाडा उत्सवाला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असून, संबळाच्या तालावर विविध प्रकारची सोंगे काढून गावकरी ग्रामदेवतेचा जागर करत आहेत. दि. 14 मे पासून सुरू झालेला हा पाच दिवसीय उत्सव सोमवारी समाप्त होणार आहे.

कनाशी हे डोंगराळ व आदिवासीबहुल गाव आहे. गावाच्या सुख-शांतीसाठी भोवाडा उत्सव साजरा करण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे. यंदाच्या उत्सवातही गावकऱ्यांनी ही परंपरा मोठ्या श्रद्धेने जपली आहे.

उत्सवाच्या पहिल्या दिवसापासूनच गावात संबळाचा निनाद घुमत आहे. सायंकाळ होताच तरुण मुले वाघ, अस्वल, हनुमान, अशी अनेक देवी देवतांची हुबेहूब सोंगे घेऊन गावातून मिरवणूक काढत आहेत. संबळाच्या विशिष्ट ठेक्यावर सोंग्यांचा फेर धरला जात असून, हे पाहण्यासाठी कनाशीसह तालुक्यातील परिसरातील बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. पाच दिवस चालणाऱ्या या लोकसंस्कृतीच्या सोहळ्यामुळे कळवण तालुक्याच्या पूर्व भागात भक्तिमय व चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे.

# एकाचा बळी जाऊनही प्रशासनाचे दुर्लक्षच? वाहने मात्र विरुद्ध दिशेने सुसाट

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

पुणे–सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन परिसरात विरुद्ध दिशेने धावणाऱ्या वाहनांमुळे नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला असून, हा महामार्ग अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनत चालला आहे. रविवार (ता.१७ मे) रोजी सकाळ आठ वाजण्याच्या दरम्यान पुणे सोलापूर महामार्गावरूनच विरुद्ध दिशेने हायवा ट्रक धावत होता. तर अशी अनेक वाहने दररोज विरुध्द दिशेने धावत आहे.

काही दिवसांपूर्वीच रॉंग साईडने आलेल्या टेम्पोच्या धडकेत एका वृद्धाचा मृत्यू झाला होता. मात्र या भीषण घटनेनंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसत नाही. उलट, दररोज पहाटेपासून सकाळी अकरा वाजेपर्यंत तसेच सायंकाळी हलकी तसेच अवजड वाहने सर्रास विरुद्ध दिशेने सुसाट धावत असल्याचे चित्र दररोज पाहायला मिळत आहे.

स्थानिक नागरिकांनी सांगितले कि, अनेक वाहनचालक वेळ वाचवण्यासाठी नियम धाब्यावर बसवत रॉंग साईडने प्रवास करत आहेत. विशेषतः टेम्पो, हायवा ट्रक, चारचाकी वाहने आणि मालवाहू वाहनांचे चालक बेफामपणे विरुद्ध दिशेने वाहने चालवत असल्याने समोरून येणाऱ्या वाहनांसोबत थेट धडक होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.




उरुळी कांचन येथे वीस दिवसांपूर्वी घडलेल्या अपघातात विरुद्ध दिशेने भरधाव आलेल्या टेम्पोने एका वृद्धाला जोरदार धडक दिली होती. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर ही ठोस उपाय योजना प्रशासनाने केली नसल्याने सतत विरुद्ध दिशेने वाहतूक होत आहे. त्यामुळे नागरिक प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. परिसरात वाहतूक पोलिसांची नियमित गस्त नसल्याने रॉंग साईडने वाहन चालवणाऱ्यांचे मनोबल वाढल्याचेही नागरिकांचे सांगितले. तसेच महामार्गावरील चौकांमध्ये कायमस्वरूपी वाहतूक पोलीस तैनात करणे, सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, रॉंग साईडने वाहन चालवणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करणे अत्यावश्यक झाले आहे.

अन्यथा भविष्यात आणखी गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, उरुळी कांचन परिसरातील नागरिकांनी प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन केले असून, "आणखी किती बळी गेल्यावर प्रशासन जागं होणार?" असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील २२३ गावे पुराच्या धोक्यात

## आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज; ५०० 'आपदा मित्र' प्रशिक्षणासह तैनात

**अहिल्यानगर (दै. संध्या)**

अतिवृष्टी, धरणांमधून होणारा विसर्ग आणि नदीपात्रांतील अतिक्रमणामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील आठ प्रमुख नद्यांलगतची तब्बल २२३ गावे पूरप्रवण ठरत आहेत. संभाव्य आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तालुकास्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार केले असून, बचावकार्याकरिता आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील प्रवरा आणि मुळा या दोन्ही नद्यांचा उगम अकोले तालुक्यात होतो. अकोले परिसरात अतिवृष्टी झाल्यास या नद्यांना पूरस्थिती निर्माण होते. प्रवरा नदीकाठावरील सर्वाधिक १०० गावे तर मुळा नदीकाठावरील २४ गावे पूरप्रवण आहेत. २००८ मध्ये प्रवरा नदीत ३८ हजार ९१३ क्युसेक प्रवाहाची नोंद झाली होती.



गोदावरी नदीचा उगम नाशिक जिल्ह्यात असला तरी कोपरगाव, श्रीरामपूर, नेवासे आणि शेवगाव तालुक्यांतील ४० गावे पुराच्या धोक्यात येतात. नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून विसर्ग वाढल्यानंतर ही परिस्थिती गंभीर बनते. २०१९ मध्ये गोदावरी नदीत २ लाख ९१ हजार ५२५ क्युसेक इतका विक्रमी प्रवाह नोंदविण्यात आला होता.

भिमा नदीकाठावरील श्रीगोंदे आणि कर्जत तालुक्यांतील २० गावे पूरप्रवण आहेत. घोड नदीकाठची ११ गावे, सीना नदीकाठची २० गावे, खैरी नदीकाठची ५ गावे आणि म्हाळुंगी नदीकाठची ३ गावेही धोक्याच्या यादीत आहेत.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे सात इन्फ्लेटेबल रबर बोटी, ५०० लाईफ जॅकेट, १५० लाईफ बोया, सर्च लाईट, स्ट्रेचर, पोर्टेबल टेन्ट, फर्स्ट एड किट, सेफ्टी हेल्मेट, रॅपलिंग रोप आदी साहित्य उपलब्ध आहे. अहिल्यानगर महापालिका, पोलिस विभाग, कोपरगाव, श्रीरामपूर, राहुरी नगरपालिका तसेच कर्जत व श्रीगोंदे तहसील कार्यालयांकडे प्रत्येकी एक बोट उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील पूरप्रवण भागांतील ५०० स्वयंसेवकांना 'आपदा मित्र' म्हणून प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना लाईफ जॅकेट, हेल्मेट, गमबूट, रेनसूट, रोप आणि एलईडी टॉर्च यांसारखी साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

> पूरप्रवण क्षेत्रांतील स्वयंसेवकांना आपत्कालीन बचावकार्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. आवश्यक सुरक्षा साहित्यही उपलब्ध करून देण्यात आले आहे.
> - डॉ. वीरेंद्र बडधे, जिल्हा व्यवस्थापन अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

